**राज्यात नैसर्गिक/सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देणे तसेच "डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन" या योजनेस मुदतवाढ देऊन दुसऱ्या टप्प्यात त्याची व्याप्ती राज्यभर वाढविण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**कृषि,पशुसंवर्धन,दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २७२२/प्र.क्र.६९/१-अ**

मंत्रालय विस्तार, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २७ जून, २०२३.

वाचा :- १) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.जैशेमि १०१८/प्र.क्र.१५/१७-अे, दिनांक १६.१०.२०१८

२) केंद्र शासनाचे पत्र ९-३५/२०१५-Org Fms (५९०६६/FTS), दि.१३.१०.२०२०.

३) नाबार्डचे पत्र क्र.NB.MRO/FSDD/६१०३/CSS-CBBO Selection/२०२०-२१, दि.०५.०३.२०२१.

४) नाबार्डचे पत्र क्र.NB.MRO/FSDD/६५१९/CSS-CBBO/२०२०-२१, दिनांक २४.०३.२०२१

५) प्रकल्प संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन, अकोला यांचे पत्र क्र.जैशमि/ मिशन मुदतवाढ प्रस्ताव/१६१३/२०२२, दिनांक १२.०१.२०२०.

६) कृषि आयुक्तालयाचे जा.क्र.कृआ/मृसमृचा/जैशीम/मुवा/६३५८/२०२१, दि.१७.०२.२०२२.

७) कृषि आयुक्तालयाचे जा.क्र.कृआ/जैशीम/मुदतवाढ/वित्त अभि/४३३६८/२०२२, दि.२६.१२.२०२२.

८) कृषि आयुक्तालयाचे जा.क्र.कृआ/मिशन मु.वाढ/९२०९/२०२३, दि.११.०३.२०२३.

९) कृषि संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय यांचे जा.क्र.डॉ.पंदेजैशेमि/मान्यता/१५१६६/२०२३ दिनांक ०३ मे, २०२३

**प्रस्तावना:-**

शेतीमध्ये सातत्याने होत असलेला रसायनांचा अतिरिक्त/अधिकचा वापर त्यामुळे खालावलेला जमिनीचा पोत तसेच रासायनिक किटकनाशकांच्या फवारणीचे मानवी आरोग्यावर होत असलेले दुष्परिणाम याला पर्याय म्हणून सेंद्रिय शेतीस सुरुवात झाली आहे. तथापि, वेगवेगळ्या पध्दतीने सेंद्रिय शेती केली जात असल्यामुळे त्याचा परिणाम दिसून येत नाही. आरोग्याविषयी जन-जागृतीमुळे प्रमाणित सेंद्रिय (रसायनमुक्त) फळे आणि अन्नधान्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या बाबी लक्षात घेता राज्य शासनाने कृषी विभागांतर्गत "डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन" ची स्थापना शासन निर्णय क्रमांक जैशेमि १०१८/प्र.क्र.१२५/१७-अे, दि.१६/१०/२०१८ अन्वये केली आहे. सदर मिशन प्रथम टप्यात अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्ह्यात राबविले जात आहे. सदर योजनेची व्याप्ती टप्याटप्याने राज्याच्या इतर जिल्ह्यांमध्ये वाढविण्यात येणार आहे असे शासन निर्णयात नमूद आहे. डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनचा कार्यकाल हा ४ वर्षांचा असून योजनेची मुदत ही ऑक्टोबर, २०२२ मध्ये संपली आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनची स्थापना दि १६.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये झालेली असून मिशनच्या कामकाजाची प्रत्यक्ष सुरुवात मिशनची नोंदणी झाल्यापासून म्हणजेच दिनांक ०३.०७.२०१९ पासून झालेली आहे. मिशनचे कामकाज सुरु झाल्यावर लगेचच मार्च - २०२०

पासून कोविड महामारीच्या प्रादुर्भावाने टाळेबंदी सुरु झाल्यामुळे व इतर निर्बंधामुळे मुलत: कार्य सुरु करण्यामध्ये अनेक अडचणी आलेल्या आहेत. त्यामुळे मिशनचे उपक्रम राबविण्यासाठी एक ते दिड वर्षाच्या कालावधीचा विलंब झालेला आहे त्यामुळे मिशनच्या सर्व बाबी ४ वर्षात पूर्ण होऊ शकल्या नाहीत.

अन्नधान्याच्या आणि संकरित वाणाच्या तसेच इतर पिकांच्या अधिक उत्पादनासाठी रासायनिक खते, किटकनाशके, बुरशीनाशके आणि तणनाशकाचा मोठ्या प्रमाणात असंतुलित वापर, पाण्याचा जास्त वापर, जमिनीची धुप, सेंद्रिय खतांचा कमी वापर अथवा अजिबात वापर न करणे, एकच पीक वारंवार घेणे इत्यादी कारणांमुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडून जमिनीतील जैविक घटकाचा विनाश झाल्याने जमिनी मृत होत चालल्या असून कडक होत आहेत. त्यामुळे जमिनीचा पोत बिघडून जमिनी नापिक होणे, पिकांची उत्पादकता कमी होणे, उत्पादित शेतमालाची प्रत खालावणे, मशागतीचा खर्च वाढणे, रासायनिक निविष्ठांच्या खरेदीमुळे उत्पादन खर्च वाढणे इत्यादी दुष्परिणाम दिसून येत आहेत. परिणामस्वरुप मानवी व पशुपक्षी यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन पर्यावरणासह जैव विविधतेस धोका निर्माण होत आहे. मानवी शरीराची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी उच्च दर्जाची सकस आणि विषमुक्त फळे, भाजीपाला आणि अन्नधान्य मागणीमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे नैसर्गिक व सेंद्रिय शेतीचे महत्व अधोरेखीत झालेले आहे, वरील दुष्परिणाम लक्षात घेता राज्यात नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे ही काळाची गरज झालेली आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनला शेतकऱ्यांचा मिळणारा चागंला प्रतिसाद पाहता मिशनची व्याप्ती वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनला आणखी ४ वर्षांची मुदतवाढ तसेच औरंगाबाद, जालना व हिंगोली या तीन जिल्ह्यात जैविक शेती मिशनची व्याप्ती वाढविण्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात आलेला होता. यासंदर्भात इतर सर्व बाबींचा समावेश करून परिपूर्ण प्रस्ताव नव्याने सादर करण्यात यावा, असे निर्देश मा. मंत्रीमंडळाने दिलेले होते. तसेच राज्याच्या २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये "नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देताना आगामी ३ वर्षात राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रीय शेतीखाली आणण्यात येईल, १००० जैवनिविष्ठा स्त्रोत केंद्रे स्थापन करून डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनची व्याप्ती वाढविण्यात येईल. यासाठी ३ वर्षांत रु.१०००.०० कोटी निधी दिला जाईल" अशी घोषणा केलेली आहे.

सद्यस्थितीत राज्यात एकूण १२.०७ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक व सेंद्रिय शेतीअंतर्गत लागवडीखाली आहे. नैसर्गिक व सेंद्रिय शेतीचे क्षेत्र २५ लाख हेक्टरवर आणावयाचे झाल्यास सद्यस्थितीतील राज्याचे एकूण १२.०७ लाख हेक्टर क्षेत्र वजा जाता उर्वरित १३.०० लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक व सेंद्रिय शेतीखाली आणणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्यात नैसर्गिक/ सेंद्रीय शेतीसंदर्भात केंद्र पुरस्कृत योजनांमार्फत जवळपास ६.३९ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रीय/नैसर्गिक शेतीखाली आणण्यात येणार आहे.

यानुषंगाने दि.३०.०५.२०२३ रोजी पार पडलेल्या बैठकीत मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेस अनुसरून डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन या योजनेअंतर्गत ६.६१ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक/ सेंद्रीय शेतीखाली आणण्याकरिता नैसर्गिक/सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे तसेच डॉ.पंजाबराव देशमुख

जैविक शेती मिशन योजनेस मुदतवाढ देऊन दुसऱ्या टप्प्यात सदर योजनेची राज्यभरात व्याप्ती वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

राज्यात नैसर्गिक/सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनला सन २०२२-२३ ते सन २०२७-२८ या कालावधी करीता मुदतवाढ देऊन सदर योजनेची व्याप्ती दुसऱ्या टप्पात राज्यभर वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनला "**<u>डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन</u>**" असे संबोधण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत राज्य योजना सन २०२२-२३ ते २०२७-२८ या कालावधीकरीता राबविण्यासाठी आवश्यक रु. १०८३.२९ कोटी इतक्या आर्थिक तरतुदीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच, याच कालावधीत केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषि विकास योजना, राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान व मोठया क्षेत्राचे प्रमाणिकरण (Large Area Certification) या योजनांतर्गत केंद्र हिस्सा रु.५०२.६२ कोटी व राज्य हिस्सा रु.३३५.०८ कोटी असा एकूण रु.८३७.७० कोटी इतक्या निधीच्या आर्थिक तरतुदीसही मान्यता देण्यात येत आहे. अशा प्रकारे राज्य योजना व केंद्र पुरस्कृत योजना अशी एकूण रु.१९२०.९९ कोटीच्या आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे

३. सदर योजनेंतर्गत जैविक निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करण्यासाठी महिला बचत गटांना प्राधान्य देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषि विकास योजना, मोठया क्षेत्राचे प्रमाणिकरण (Large Area Certification) व राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान या योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांच्या अधीन राहून राज्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित करून राबविण्यास आयुक्त(कृषि) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.जैशोमि १०१८/प्र.क्र.१५/१७-अे, दिनांक १६.१०.२०१८ नुसार डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनची स्थापना करण्यात आलेली असून डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनची स्थापना करताना वर नमुद शासन निर्णयामध्ये या योजनेची व्याप्ती राज्याच्या इतर जिल्ह्यामध्ये वाढविण्यात येणार आहे असे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार आता मिशनची व्याप्ती वाढवून सदर योजना संपूर्ण राज्यभरात राबविण्यात येईल व डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन या योजनेस मुदतवाढ देऊन दुसरा टप्प्यात सदर योजना खालीलप्रमाणे राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| मिशनचे नाव | :डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन |
| अध्यक्ष | : आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. |
| मिशन मुख्यालय | : अकोला |
| कार्यक्षेत्र | :संपुर्ण महाराष्ट्र राज्य |
| मुदतवाढ | : ६ वर्ष (सन २०२२-२३ ते २०२७-२८) |

आर्थिक भार :डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन करिता रु.१०८३.२९ कोटी व केंद्र पुरस्कृत योजनेकरिता केंद्र हिस्सा रु.५०२.६२ कोटी व राज्य हिस्सा रु.३३५.०८ कोटी असा एकूण रु. १९२०.९९ कोटी

- **उद्दिष्टे** –

I. नैसर्गिक व सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्रात रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर थांबवून आणि जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवून जमिनीची सुपिकता व आरोग्य सुधारणे.

II. रसायनमुक्त सुरक्षित, सकस व पोषणयुक्त नैसर्गिक व सेंद्रिय शेतमाल उत्पादित करणे.

III. नैसर्गिक व सेंद्रिय शेतमालाची मुल्यसाखळी विकसित करणे.

IV. नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देणे आणि कृषि विद्यापीठ व कृषि विज्ञान केंद्र यांच्या समन्वयाने नैसर्गिक व सेंद्रिय शेतीखालील क्षेत्रात वाढ करणे.

V. समुह संकल्पनेद्वारे १८,८२० उत्पादक गटांची स्थापना करणे आणि गटांचे समुह तयार करून १८२५ शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना करणे.

VI. शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्तरावर शेतावरील जैविक निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करून स्थानिक पातळीवर जैविक निविष्ठा उपलब्ध करणे.

- **डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन प्रकल्प संरचना** –

डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन या नावाने संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणी करण्यात आलेली आहे.

- **डॉ . पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन नियामक मंडळ** (Mission Governing Council) –

अध्यक्ष : आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
उपाध्यक्ष : कृषि संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
सदस्य : राज्यातील ४ कृषि विद्यापीठांचे संशोधन संचालक
सदस्य : कृषि संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
सदस्य : कृषि संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
सदस्य : कृषि संचालक, विस्तार व प्रशिक्षण, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
सदस्य : संचालक, महाराष्ट्र सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला
सदस्य : सेंद्रिय शेती विषयक तज्ञ (४ अशासकीय सदस्य)
सदस्य सचिव : प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला

- **डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन नियामक मंडळाचे अधिकार व कार्ये**–

I. मिशनबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

II. वार्षिक आराखड्यास मान्यता देणे.

III. वर्षातुन किमान दोन वेळा बैठक घेऊन योजनेचा आढावा घेणे.

IV. शासनास सेंद्रिय शेतीबाबत धोरणात्मक निर्णयासाठी शिफारशी करणे.

- **डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन कार्यकारी मंडळ** (Mission Management Committee)-

अध्यक्ष : कृषि संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
उपाध्यक्ष : प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन
सदस्य : विभागीय संचालक, विभागीय सेंद्रिय व नैसर्गिक शेती केंद्र (RCONF), नागपूर
सदस्य : संचालक, कृषी तंत्रज्ञान ॲप्लिकेशन रिसर्च इन्स्टिटट्यूट (ATARI), झोन VIII, पुणे
सदस्य : महाराष्ट्रातील ४ कृषि विद्यापिठांचे सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख
सदस्य : अतिरीक्त आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
सदस्य : कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
सदस्य : कृषि उपसंचालक, नैसर्गिक व सेंद्रिय शेती
सदस्य सचिव : कृषि उपसंचालक, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन

- **डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन कार्यकारी मंडळाचे अधिकार व कार्ये-**

I. वार्षिक आराखडा तयार करणे.
II. विविध योजनांचे अभिसरण (Convergence) करणे.
III. योजना अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे.
IV. विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधणे.
V. वर्षनिहाय व घटकनिहाय तरतुदीमधील बदलास मान्यता देणे.
VI. योजना अंमलबजावणीसाठी तांत्रिक शिफारशी करणे आणि मार्गदर्शक सुचना तयार करणे.

- **जिल्हा मिशन व्यवस्थापन समिती -**

अध्यक्ष : प्रकल्प संचालक, आत्मा
सहअध्यक्ष : जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
सदस्य : जिल्ह्यातील कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ
सदस्य : सेंद्रिय शेतीमध्ये काम करणारे शेतकरी उत्पादक कंपन्यांचे दोन प्रतिनिधी
सदस्य सचिव : प्रकल्प उपसंचालक/तंत्र अधिकारी (सेंद्रिय शेती)

- **जिल्हा मिशन व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये -**

I. जिल्ह्याचा वार्षिक आराखडा तयार करणे.
II. जिल्ह्यांतर्गत विविध योजनांचे अभिसरण (Convergence) करणे.
III. जिल्ह्यात योजनेची अंमलबजावणी करणे.
IV. विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधणे.
V. वर्षनिहाय व घटकनिहाय तरतुदी मधील बदलाबाबत शिफारस करणे.

## ६. वित्तीय व्यवस्थापन-

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनसाठी स्वतंत्र वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका तयार करून त्यास मिशन नियामक मंडळाची मान्यता घेऊन त्यानुसार प्रकल्पाची अंमलबजावणी करावी.

केंद्र पुरस्कृत आणि राज्य पुरस्कृत सेंद्रिय शेती विषयक योजनांचा निधी शासनस्तरावरून आयुक्त, कृषि यांना वितरीत करण्यात येईल. कृषि आयुक्तस्तरावरून अन्य केंद्र पुरस्कृत योजनांप्रमाणे कोषागारातुन निधी आहरीत करून सिंगल नोडल एजन्सी (SNA) आणि पी.एफ.एम.एस वित्तीय प्रणालींचा वापर करून निधी मिशन कार्यालयाला व प्रकल्प संचालक, आत्मा तसेच योजना अंमलबजावणी करणाऱ्या अन्य यंत्रणांना वितरीत करण्यात यावा. या योजनेसाठी कोषागारातुन निधी आहरीत करण्यासाठी कृषि संचालक, आत्मा यांना नियंत्रण अधिकारी आणि सहाय्यक संचालक, लेखा-१, कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे.

राज्य आणि जिल्हास्तरावर केंद्र पुरस्कृत योजनांप्रमाणे राज्य पुरस्कृत डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनकरीता स्वतंत्र बँक खाते उघडण्यास वित्त विभागाच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येईल.मिशन कार्यालयाचे वार्षिक लेखापरिक्षण महालेखापालाच्या पॅनलवरील सनदी लेखापालाकडुन करावे व लेखापरिक्षण अहवालास मिशन नियामक मंडळाची मान्यता घ्यावी.

## ७. प्रशासकीय व्यवस्थापन-

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन आणि त्याअंतर्गत योजनांचे प्रशासकीय नियंत्रण आयुक्त कृषि यांचेकडे राहील. कृषि आयुक्तालय कार्यालयांतर्गत ही योजना कृषि संचालक, आत्मा यांचे अधिनस्त राहील व त्यांचे अधिनस्त डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन कार्यालयाचे कामकाज राहील. विभागस्तरावर या योजनेचे संनियंत्रण विभागीय कृषि सहसंचालक करतील आणि जिल्हास्तरावर ही योजना प्रकल्प संचालक, आत्मा हे उपविभागीय कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी या कार्यालयामार्फत राबवतील.

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन युनिट मधील प्रकल्प संचालक, कृषि उप संचालक, लेखाधिकारी या पुर्वीच्या पदांना उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात येत असुन योजनेची व्याप्ती लक्षात घेऊन योजनेच्या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे अतिरीक्त पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. अतिरीक्त पदांची निर्मिती उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेच्या अधिन राहुन करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संवर्ग | पदांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | कृषि सेवा गट-अ वरीष्ठ (अधिक्षक कृषि अधिकारी) | १ | मिशन कार्यालयात-१ |
| २ | कृषि सेवा वर्ग-१ (कृषि उपसंचालक) | २ | संचालक, आत्मास्तरावर-१,<br>मिशनस्तरावर-१ |
| ३ | कृषि सेवा वर्ग-२ (तंत्र अधिकारी) | ३८ | संचालक, आत्मास्तरावर-२,<br>मिशन कार्यालयात-२,<br>जिल्हास्तरावर प्रत्येकी-१ |

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत आवश्यकतेनुसार कंत्राटी मनुष्यबळ बाह्यस्त्रोत यंत्रणेच्या माध्यमातुन योजनेच्या कालावधी पर्यंत घेण्याचे अधिकार मिशनच्या नियामक मंडळाला राहतील.

८. **राज्यात नैसर्गिक/सेंद्रीय शेती अंतर्गत केंद्र व राज्य योजनांची संक्षिप्त माहिती पुढीलप्रमाणे-**

**केंद्र पुरस्कृत योजना-**

**i. परंपरागत कृषि विकास योजना-**

सेंद्रिय शेतीवर आधारीत प्रशिक्षण व प्रात्यक्षिके, शेतावर सेंद्रिय शेती निविष्ठा तयार करुन वापरण्यास प्रोत्साहन देणे, सेंद्रिय प्रमाणिकरण, शेतमालाची विक्री व्यवस्था करणे, कमी खर्चाच्या तंत्रज्ञानाचा अवलंब करुन शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करणे हे मुख्य उद्दिष्ट आहेत. योजना गट आधारित असून २० हे. क्षेत्राचा गट व अश्या १५ गटांची एक शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्यात येत आहे. योजनेचा कालावधी तीन वर्षाचा आहे. म्हणजेच प्रथम वर्षी निवड केलेल्या गटाला सलग तीन वर्षापर्यंत लाभ देण्यात येतो. योजनेअंतर्गत एका गटास तीन वर्षात रु. ६.३० लाख अर्थसहाय्य देण्यात येते. योजनेअंतर्गत एकूण ३०५० गटांचे ०.६१ लाख क्षेत्र प्रस्तावित असून त्यास २ टक्के आकस्मिक खर्चासह एकूण रु. २१४.८६ कोटी आर्थिक तरतूद प्रस्तावित आहे.

**ii. राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान-**

शेतकऱ्यांना बाहेरुन निविष्ठा खरेदी पासुन मुक्त करणे, उत्पादन खर्चात बचत करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे अशा स्वतंत्र पर्यायी शेती पध्दतीस प्रोत्साहन व चालना देणे हे मुख्य उद्दिष्ट आहेत. सदर योजना गट आधारित असून ५० हे. क्षेत्राचा एक गट याप्रमाणे गट स्थापन करावयाचे असून अश्या १० गटांची शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करावयाची आहे. प्रथम वर्षी निवड केलेल्या गटात निवड केलेल्या शेतकऱ्यांची शेती शाळा घ्यावयाची असून त्यामधील इच्छुक शेतकऱ्यांच्या गटास पुढील तीन वर्षे योजनेचा लाभ द्यावयाचा आहे. एकदा निवड केलेल्या गटास/शेतकऱ्यास ४ वर्षे लाभ द्यावयाचा असून रु. १३.३६ लाख अर्थसहाय्य देय असणार आहे. अभियाना अंतर्गत एकूण २५५० गटांचे १.२८ लाख क्षेत्र प्रस्तावित असून त्यास २ टक्के आकस्मिक खर्चासह एकूण रु. ३४७.४४ कोटी आर्थिक तरतूद प्रस्तावित आहे.

**iii. मोठया क्षेत्राचे प्रमाणिकरण** (Large Area Certification-PKVY component)-

परंपरागत कृषि विकास योजनेअंतर्गत हा घटक मंजूर आहे. पारंपारिक सेंद्रीय शेती पध्दतीमध्ये यापूर्वी रासायनिक निविष्ठांचा वापर केला नसलेल्या मोठया क्षेत्राचा समावेश, वैयक्तिक इच्छुक शेतकरी

किंवा लहान शेतकरी गट, पीकेव्हीवाय गटांमध्ये समाविष्ट नसलेले मोठे शेतकरी यांना या योजनेमध्ये फक्त प्रमाणिकरणाची सुविधा तसेच उर्वरित अंश विश्लेषणासाठी १०० हे. क्षेत्रामधून ३ शेतमालाचे नमुने तपासणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध आहे. योजनेअंतर्गत रु. ६०००/- प्रति हेक्टर अर्थसहाय्य देय आहे. योजनेअंतर्गत प्रमाणिकरण ही बाब केंद्र पुरस्कृत योजनेमधून राबविण्यात येणार असून शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे व त्यांचे प्रशिक्षण, शेतकरी उत्पादक कंपनी व गट स्तरावर जैविक निविष्ठा केंद्र, शेतकरी उत्पादक कंपनीस पणन सुविधेसाठी अर्थसहाय्य इत्यादी बाबी राज्य पुरस्कृत डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक

शेती मिशन या योजनेमधून राबविण्याचे प्रस्तावित आहे. योजने अंतर्गत एकूण ४.५० लाख क्षेत्र प्रस्तावित असून त्यास २ टक्के आकस्मिक खर्चासह एकूण रु. २७५.४० कोटी आर्थिक तरतूद प्रस्तावित आहे.

**९. राज्य पुरस्कृत डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेंतर्गत घटक खालीलप्रमाणे-**

**i. नैसर्गिक सेंद्रिय शेती क्षेत्र विस्तार-**

राज्यातील नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस चालना देण्यासाठी सदर योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. योजनेअंतर्गत ५० हे. क्षेत्राचा एक गट याप्रमाणे १० गटांचा एक समुह व त्या समुहाची शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करावयाची आहे. योजनेअंतर्गत आर्थिक मर्यादेच्या अधिन राहून तृतिय पक्ष प्रमाणिकरण (National Programme for Organic Production -NPOP), सहभागिता हमी पध्दती (Participatory Guarantee System-PGS) अथवा नैसर्गिक शेती प्रमाणिकरण या तीन पैकी कोणतीही एक प्रमाणिकरण पध्दती निवड करण्याची मुभा राहील. योजनेअंतर्गत एकदा निवड केलेल्या शेतकरी/गटास तीन वर्षात ७,०००/- रु. प्रति हेक्टर लाभ देय असेल. त्याकरिता २ टक्के आकस्मिक खर्चासह एकूण रु. ४७१.९५ कोटी इतक्या आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे. क्षेत्र विस्तारामध्ये कृषि विभागासोबतच कृषि विज्ञान केंद्र व कृषि विद्यापीठे यांचा सहभाग राहील.

**ii. शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे व त्यांचे प्रशिक्षण-**

शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणेसाठी नोंदणी खर्च तसेच कंपनीच्या संचालक मंडळास वेळोवेळी प्रशिक्षण देणेसाठी २ टक्के आकस्मिक खर्चासह एकूण रु.१३.९४ कोटी इतक्या आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे.

**iii. जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (Bio-Input Resource Centre)-**

**अ) शेतकरी उत्पादक कंपनी स्तरावर जैविक निविष्ठा संसाधन केंद्र -**

शेतकरी उत्पादक कंपनीस्तरावर नैसर्गिक व सेंद्रिय निविष्ठा निर्मिती करण्यासाठी एक जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (Bio-Input Resource Centre) स्थापित करण्यासाठी खर्चाच्या ७५ टक्के किंवा रु. ५.०० लाख यापैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य देय असेल व २५ टक्के शेतकरी उत्पादक कंपनीचा हिस्सा असेल. याकरिता २ टक्के आकस्मिक खर्चासह एकूण रु. ६९.७२ कोटी इतक्या आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे.

**ब) गट स्तरावर जैविक निविष्ठा संसाधन केंद्र-**

गट स्तरावरील एका शेतकऱ्याच्या शेतात नैसर्गिक व सेंद्रिय निविष्ठा निर्मिती करण्यासाठी एक जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (Bio-Input Resource Centre) स्थापित करण्यासाठी खर्चाच्या ७५ टक्के किंवा रु. २.०० लाख यापैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य देय असेल व २५ टक्के शेतकरी/गटाचा हिस्सा असेल. याकरिता २ टक्के आकस्मिक खर्चासह एकूण रु. २६९.६९ कोटी इतक्या आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे.

### iv. शेतकरी उत्पादक कंपनीस पणन सुविधेसाठी अर्थसहाय्य-

शेतकरी उत्पादक कंपनी स्तरावर पणन सुविधेसाठी एक विक्री केंद्र स्थापन करावयाचे असून त्याकरीता वाहन खरेदी किंवा विक्री केंद्र बांधणीसाठी खर्चाच्या ७५ टक्के किंवा रु. ४.५० लाख यापैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय्य देय असेल. तसेच प्रसिध्दी, विक्री मेळावे इत्यादी करीता रु. ०.५० लाख अर्थसहाय्य देय असेल. त्याकरीता २ टक्के आकस्मिक खर्चासह एकूण रु. ६९.७२ कोटी इतक्या आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे.

### v. प्रकल्प व्यवस्थापन कक्ष-

योजनेअंतर्गत सन २०२०-२१ मधील ३५५ गट सन २०२२-२३ मधील ५०० गट असे एकूण सद्यस्थितीतील ८५५ गट यांची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीने करण्यात यावी. तसेच योजनेअंतर्गत सेंद्रिय शेतीचे एनपीओपीअंतर्गत प्रमाणिकरण करणे, एफपीसी स्तरावर समुह संकलन केंद्र (Cluster Aggregation Centre-CAC), विभागस्तरावर एक याप्रमाणे एकूण आठ सामुहिक सुविधा केंद्र (Common Facility Centre-CFC), उत्पादित सेंद्रिय उत्पादनांची प्रक्रिया व मूल्यवृद्धी करणे, विक्री केंद्र स्थापन करणे, संगणकीकरण, योजनेची व्याप्ती लक्षात घेता, कृषि आयुक्तालय, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, विभाग, जिल्हा व तालुकास्तरावर आवश्यकतेनुसार बाहयस्त्रोताव्दारे कंत्राटी कर्मचारी उपलब्ध करणे इत्यादी बाबींसाठी एकूण रु. १५७.०२ कोटी आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे. प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचा बाबनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे-

(रु.लाखांत)

| अ. क्र. | विवरण/घटक | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्षमता संवर्धन / बांधणी | १४५.९८ | ६४.३९ | ४७.७३ | ०.०० | ०.०० | २५८.१० |
| २ | सेंद्रिय शेती पद्धती अवलंब करण्यासाठी सेंद्रिय निविष्ठा निर्मिती व वापर | २६५.०० | २००.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ४६५.०० |
| ३ | सेंद्रिय प्रामाणिकरण | १८९.७० | ५९.७० | ३७.२० | ०.०० | ०.०० | २८६.६० |
| ४ | बाजारपेठाशी दुवा | ३१२.०० | ७२.०० | ९१.६० | ०.०० | ०.०० | ४७५.६० |
| ५ | प्राथमिक व द्वितीय स्तर प्रक्रिया युनिट स्थापन करणे | ७०.४० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ७०.४० |
| ६ | द्वितीय स्तर प्रक्रिया (महासंघ) | १५५०.०० | १३५०.०० | ४५०.०० | ०.०० | ०.०० | ३३५०.०० |
| ७ | कृती संशोधन | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |

| अ. क्र. | विवरण/घटक | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७.१ | संशोधन (कृषी विद्यापीठाद्वारा) | १५०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | १५०.०० |
| ७.२ | आद्यरेषीय प्रात्याक्षिके (kvk मार्फत) | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७.३ | नाविन्यपूर्ण उपक्रम | ७०.०० | ५२.०० | ३०.०० | ०.०० | ०.०० | १५२.०० |
| ८ | समूह आधारित जैविक निविष्टा उत्पादन उपक्रम | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८.१ | FPC स्तरावरील जैविक निविष्ठा संसाधन केंद्र | ११५.०० | १६५.०० | १००.०० | ०.०० | ०.०० | ३८०.०० |
| ८.२ | गटस्तरावरील जैविक निविष्ठा निर्मिती संसाधन केंद्र | ४६.०० | ६६.०० | ४०.०० | ०.०० | ०.०० | १५२.०० |
| ८.३ | सेंद्रिय बिजोत्पादन | ४६.०० | ६६.०० | ४०.०० | ०.०० | ०.०० | १५२.०० |
| ९ | मिशन व्यवस्थापन खर्च | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ९.१ | प्रकल्प व्यवस्थापन अधिकारी/कर्मचारी वेतन, भत्ते, व इतर खर्च ई | १४१८.४० | १३०९.६० | १३०९.६० | १४१०.८० | १३१०.८० | ६७५९.२० |
| ९.२ | प्रकल्प व्यवस्थापन आस्थापना व कार्यालयीन खर्च ई. | ५७६.१० | ५२५.०० | ७३०.०० | ०.०० | ०.०० | १८३०.०० |
| ९.३ | प्रकल्प व्यवस्थापन संगनीकीकरण (MIS Development & Digitazation | २००.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | २००.०० |
| १० | सेवा प्रदाता सेवा शुल्क | २५०.०० | १००.०० | ५०.०० | ०.०० | ०.०० | ४००.०० |
| ११ | आकस्मिक खर्च | २०.०० | १००.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | १२०.०० |
| १२ | शासकीय अधिकारी वेतन | १३६.०० | ९१.०० | ९१.०० | ९१.०० | ९१.०० | ५००.०० |
| | एकूण | **५५६०.५८** | **४२२०.६९** | **३०१७.१३** | **१५०१.८०** | **१४०१.८०** | **१५७०२.००** |

**vi. कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण व प्रात्यक्षिके-**

राज्यातील एकूण ४५ कृषि विज्ञान केंद्रांवर नैसर्गिक व सेंद्रिय निविष्ठांसाठी कल्चर निर्मिती, निविष्ठा निर्मिती प्रात्यक्षिक, कार्यक्षेत्रातील गावात गट स्थापन करुन प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा (PIA) म्हणून काम करणे, कर्मचारी व शेतकरी प्रशिक्षण इत्यादी बाबींसाठी एकूण रु. ११.२५ कोटी आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे.

**vii. कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून संशोधन व प्रशिक्षण-**

राज्यातील एकूण ४ कृषि विद्यापीठांच्या स्तरावर असलेल्या ४ सेंद्रिय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रांवर नैसर्गिक व सेंद्रिय शेतीसंबंधीत संशोधन, प्रक्षेत्र विकसित करणे, पिकनिहाय लागवड पध्दती (Package of Practices) विकसित करणे, नैसर्गिक व सेंद्रिय निविष्ठांची चाचणी करुन वैधता (Validation) करणे, शेतकरी वापर करत असलेले प्रचलित पध्दती व विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास, कार्यक्षेत्रातील गावात गट स्थापन करुन प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा (PIA) म्हणून काम करणे, अभ्यास दौरा, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण इत्यादी बाबींसाठी एकूण रु. २०.०० कोटी आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे.

**१०. केंद्र पुरस्कृत योजना व डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत एकूण क्षमता बांधणी/ प्रशिक्षण कार्यक्रम**

राज्यात २५.०० लाख हे क्षेत्रावर नैसर्गिक सेंद्रिय शेती करावयाची झाल्यास यात सहभागी होणारे शेतकरी, शेतकऱ्यांचे गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा आणि त्यातील अधिकारी व कर्मचारी यांची क्षमता बांधणी होणे, त्यांना प्रशिक्षण देणे अत्यंत महत्वाचे आहे. ही बाब लक्षात घेऊन डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत त्रिस्तरीय प्रशिक्षण व्यवस्था निर्माण करण्यात येईल. त्यात राज्यस्तरावर नैसर्गिक सेंद्रिय शेतीबाबतचे प्रशिक्षण राज्यातील ४ कृषि विद्यापीठामध्ये स्थापित सेंद्रिय संशोधन केंद्रामार्फत, जिल्हास्तरावर कृषि विज्ञान केंद्रांमार्फत आणि गावपातळीवर प्रशिक्षित कर्मचारी आणि समूह संसाधन तज्ञामार्फत प्रशिक्षण देण्यात येईल.

१. **कृषि विद्यापीठामध्ये स्थापित सेंद्रिय संशोधन केंद्रामार्फत प्रशिक्षण** - या केंद्रामार्फत प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांचे अधिकारी ज्यात कृषि व संलग्न विभागांचे अधिकारी, कृषि विभागांतर्गत प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षक, कृषि विज्ञान केंद्रातील प्रशिक्षक, शास्त्रज्ञ यांचे प्रशिक्षण घेण्यात येईल. या केंद्रांमार्फत जिल्हास्तरावर घ्यावयाच्या कर्मचाऱ्यांच्या आणि जिल्हा व ग्रामस्तरावर घ्यावयाच्या शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाचे ट्रेनिंग मोड्यूल विकसित करून तज्ञ प्रशिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात येईल. सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यासाठी पीकनिहाय लागवड तंत्रज्ञान पद्धतीबाबत, सेंद्रिय निविष्ठा उत्पादन केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक ट्रेनिंग मोड्यूल विकसित करून या बाबींचे प्रशिक्षण या केंद्रात देण्यात येईल. तसेच सेंद्रिय उत्पादनांची मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी व याबाबतच्या शेतीशाळांचे आवश्यक ट्रेनिंग मोड्यूल विकसित करून त्याबाबतचे प्रशिक्षण घेण्यात येईल. याशिवाय सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी आवश्यक ट्रेनिंग मोड्यूल विकसित करून तज्ञ प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येईल.

**२. जिल्हास्तरावर कृषि विज्ञान केंद्रांमार्फत प्रशिक्षण -** नैसर्गिक सेंद्रिय शेती योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी तसेच समूह संसाधन व्यक्ती, प्रवर्तक शेतकरी, शेतकरी गटांचे प्रमुख, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक इ. चे प्रशिक्षण कृषि विज्ञान केंद्रांमार्फत घेण्यात येईल. कृषि विद्यापीठामार्फत विकसित केलेल्या मोड्यूलचे प्रत्यक्ष प्रशिक्षण कृषि विज्ञान केंद्रात देण्यात येईल.

३. **ग्रामपातळीवर शेतकऱ्यांचे प्रशिक्षण -** गावपातळीवर नैसर्गिक सेंद्रिय शेती कार्यक्रमात सहभागी शेतकऱ्यांचे प्रशिक्षण डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, कृषि विद्यापीठ आणि कृषि विज्ञान केंद्रात प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षित क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी, प्रवर्तक शेतकरी व समूह संसाधन तज्ञामार्फत घेण्यात येईल. या योजनेत सहभागी शेतकऱ्यांसाठी शेतीशाळांचे आयोजन करण्यात येईल आणि या शेतीशाळा प्रशिक्षकांचे प्रशिक्षण घेतलेल्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत घेण्यात येतील.

याशिवाय कृषि विभागांतर्गत वनामती, रामेती या प्रशिक्षण संस्थांमध्ये आवश्यकतेनुसार प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात येईल.

**प्रशिक्षणाचे नियोजन**

| अ.क्र. | प्रशिक्षणार्थी | भौतिक लक्षांक | प्रति प्रशिक्षणार्थी प्रस्तावित खर्च (रुपयात) | एकूण तरतूद (कोटीत) |
|---|---|---|---|---|
| **अ )** | **शेतकरी** | | | |
| i | गटप्रमुख तथा प्रवर्तक शेतकरी | १८८२० | ५००० | ९.४१ |
| ii | शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक | ३६५० | ५००० | १.८३ |
| iii | सेंद्रिय शेती करणारे शेतकरी | १३००००० (१३ लाख) | १५०० | १९५.०० |
| **एकूण (अ)** | | | | **२०६.२४** |
| **ब)** | **अधिकारी, शास्त्रज्ञ , कर्मचारी** | | | |
| i | क्षेत्रीय अधिकारी/ शास्त्रज्ञ | ३६५० | १०००० | ३.६५ |
| ii | कर्मचारी | १८८२० | ७००० | १३.८० |
| **एकूण (ब)** | | | | **१७.४५** |
| **एकूण (अ) + एकूण (ब)** | | | | **२२३.६९** |

उपरोक्त प्रशिक्षण कार्यक्रमासाठी येणारा खर्च योजनेत प्रस्तावित खालील बाबींमधून करण्यात येईल.

सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च योजनेत प्रस्तावित प्रति हेक्टर देय अनुदानातून करण्यात यावा. क्षेत्रीय अधिकारी, कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, कर्मचारी, गटप्रमुख तथा प्रवर्तक शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक यांच्या प्रशिक्षणाचा खर्च कृषि विद्यापीठे आणि कृषि विज्ञान केंद्रांना प्रस्तावित अनुदानातून करण्यात यावा. उपरोक्त नियोजनामध्ये प्रति प्रशिक्षणार्थी प्रस्तावित खर्च सूचक (indicative) असून प्रशिक्षण मोड्यूलच्या आवश्यकतेनुसार प्रति प्रशिक्षणार्थी येणाऱ्या खर्चाचे मापदंड जैविक शेती

नियामक मंडळाच्या मान्यतेने अंतिम करावेत. याशिवाय शेतकरी, अधिकारी, शास्त्रज्ञ, कर्मचारी यांचेसाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण व अभ्यास दौरे, प्रदर्शनांचे आयोजन व सहभाग या बाबी कृषि विद्यापीठांच्या उपलब्ध तरतुदीतून जैविक शेती नियामक मंडळाच्या मान्यतेने करण्यात येईल. तसेच, क्षेत्रीय स्तरावर कौशल्य विकास विभागासोबत सल्लामसलत करुन अभिसरणाव्दारे योजना राबविण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

**कृषि विद्यापीठ आणि कृषि विज्ञान केंद्रांचा प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून सहभाग -**

प्रशिक्षणा व्यतिरिक्त नैसर्गिक सेंद्रिय शेतीबाबत आवश्यक संशोधन आणि या संस्थांच्या प्रक्षेत्रावर नैसर्गिक सेंद्रिय शेतीबाबत प्रात्याक्षिकांचे आयोजन करण्यात येईल. त्याशिवाय प्रत्येक जिल्ह्यात किमान एक शेतकरी उत्पादक कंपनी व त्या अंतर्गत शेतकरी गटांची स्थापना करून नैसर्गिक सेंद्रिय शेतीसाठी योजनेतील सर्व बाबींचे आयोजन व त्यासाठी क्षेत्रीय कामे योजनेत सहभागी सर्व कृषि विज्ञान केंद्रे प्रत्येक जिल्ह्यात किमान एक आणि चारही कृषि विद्यापीठे (त्यांचे अधिनस्त संस्थांच्या मदतीने प्रत्येक जिल्ह्यात एक स्वतंत्ररित्या) करतील. यासाठी आवश्यक प्रति जिल्हा लक्षांक व तरतूद योजनेतून कृषि विद्यापीठे आणि कृषि विज्ञान केंद्रांना देण्यात येईल.

११. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेच्या अंमलबजावणीकरिता सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित करून राबविण्यास आयुक्त(कृषि) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१२. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन मार्फत सेंद्रिय व नैसर्गिक शेतीबाबत केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांचा व सन २०२३-२४ ते २०२७-२८ या कालावधीतील तरतुदींचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| अ क्र | योजना | मापदंड | गट (संख्या) | क्षेत्र (लाख हे.) | एफपीसी (संख्या) | केंद्र हिस्सा (रु.कोटी) | राज्य हिस्सा (रु.कोटी) | एकूण (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) केंद्र पुरस्कृत योजना | | | | | | | | |
| १ | परंपरागत कृषि विकास योजना(रू. प्रति हे.) | ३२,१३० | ३,०५० | ०.६१ | २०३ | १२८.९२ | ८५.९५ | २१४.८६ |
| २ | राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान(रू. प्रति हे.) | २७,२५० | २,५५० | १.२८ | २५५ | २०८.४६ | १३८.९८ | ३४७.४४ |
| ३ | मोठया क्षेत्राचे प्रमाणिकरण (Large Area Certification) (रू. प्रति हे.) | ६,१२० | ० | ४.५० | ४५ | १६५.२४ | ११०.१६ | २७५.४० |
| **एकूण केंद्र पुरस्कृत योजना** | | | **५,६००** | **६.३९** | **५०३** | **५०२.६२** | **३३५.०८** | **८३७.७०** |
| **डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन - राज्य योजना (१०० टक्के)** | | | | | | | | |
| १ | नैसर्गिक सेंद्रिय शेती- क्षेत्र विस्तार व शेतकरी प्रशिक्षण(रू. प्रति हे.) | ७,१४०. | १३,२२० | ६.६१ | १,३२२ | ०.०० | ४७१.९५ | ४७१.९५ |

| अ क्र | योजना | मापदंड | गट (संख्या) | क्षेत्र (लाख हे.) | एफपीसी (संख्या) | केंद्र हिस्सा (रु.कोटी) | राज्य हिस्सा (रु.कोटी) | एकूण (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे व त्यांचे प्रशिक्षण(रू. प्रति कंपनी) | १,०२,००० | ० | ०.०० | १,३६७ | ०.०० | १३.९४ | १३.९४ |
| ३ | शेतावरील जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (On farm Bio-Input Resource Centre) | | | | | | | |
| अ) | शेतकरी उत्पादक कंपनी स्तरावर जैविक निविष्ठा केंद्र(रू. प्रति कंपनी) | ५,१०,००० | ० | ०.०० | १,३६७ | ०.०० | ६९.७२ | ६९.७२ |
| ब) | शेतकरी गट स्तरावर जैविक निविष्ठा केंद्र (रू. प्रति गट) | २,०४,००० | १३,२२० | ०.०० | ० | ०.०० | २६९.६९ | २६९.६९ |
| ४ | शेतकरी उत्पादक कंपन्यांना पणन सुविधेसाठी अर्थसहाय्य (रू. प्रति कंपनी) | ५,१०,००० | ० | ०.०० | १,३६७ | ०.०० | ६९.७२ | ६९.७२ |
| ५ | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष | -- | ० | ०.०० | ० | ०.०० | १५७.०२ | १५७.०२ |
| ६ | कृषि विज्ञान केंद्रामार्फत कल्चर निर्मिती केंद्र, प्रात्यक्षिक, कर्मचारी व शेतकरी प्रशिक्षण (४५ केव्हीके) | रु .२५.०० लाख प्रति केव्हीके | ० | ०.०० | ० | ०.०० | ११.२५ | ११.२५ |
| ७ | कृषि विद्यापीठ स्तरावर स्थापित सेंद्रिय संशोधन केंद्रास अर्थसहाय्य (४ विद्यापीठ) | रु. ५००.०० लाख प्रति विद्यापीठ | ० | ०.०० | ० | ०.०० | २०.०० | २०.०० |
| **एकूण एकंदर राज्य योजना** | | -- | **१३,२२०** | **६.६१** | **१३२२** | **०.००** | **१०८३.२९** | **१०८३.२९** |
| **एकूण एकंदर केंद्र व राज्य योजना** | | -- | **१८,८२०** | **१३.००** | **१८२५** | **५०२.६२** | **१४१८.३७** | **१९२०.९९** |

## वर्षनिहाय आर्थिक भाराचा तपशिल -

(रु.कोटीत)

| अ.क्र. | वर्ष | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | ८७.९९ | १९७.३५ | २८५.३४ |
| २ | २०२४-२५ | १२५.५३ | ३८४.८७ | ५१०.४० |
| ३ | २०२५-२६ | १४४.०३ | ४३१.४३ | ५७५.४६ |
| ४ | २०२६-२७ | ११५.२७ | ३२६.८६ | ४४२.१३ |
| ५ | २०२७-२८ | २९.८० | ७७.८६ | १०७.६६ |
| | **एकूण** | **५०२.६२** | **१,४१८.३७** | **१,९२०.९९** |

१३. **डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेचे सनियंत्रण व मुल्यमापन -**

मिशनच्या कार्याची व योजना अंमलबजावणीची माहीती संकलित करण्यासाठी MIS तसेच संनियंत्रण व मुल्यमापन (M & E) व्यवस्था विकसित करावी तसेच मध्यवर्ती मुल्यमापन व अंतिम मुल्यमापन अहवाल तयार करावेत. प्रकल्प कालावधी संपल्यानंतर गटाचे कार्य सुरळीत सुरु राहण्यासाठी संसाधन निर्गमन व्यवस्था (Exit Protocol) विकसित करावी.

१४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६३/कार्यासन १४३१, दि. २१.०३.२०२३ अन्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१६१/२०२३/व्यय-१, दि. २१.०६.२०२३ यांनी दिलेल्या तसेच मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२३०६२७१९०२२७६४०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( उमेश चांदिवडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.विरोधी नेता (विधानसभा/विधानपरिषद), यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
३) मा. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई
४) मा. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग मंत्रालय, मुंबई
५) मा.अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६) मा.मुख्य सचिवांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
७) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर.
९) कुलगुरू, वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ, जि. परभणी.
१०) कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.
११) कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, जि. अकोला.
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज), अकोला.
१३) संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१७) विभागीय संचालक, राष्ट्रीय जैविक व नैसर्गिक शेती केंद्र, नागपूर.
१८) संचालक, कृषी तंत्रज्ञान ॲप्लिकेशन रिसर्च इन्स्टिटयूट (ATARI), झोन VIII, पुणे
१९) विभागीय कृषि सहसंचालक (सर्व).
२०) प्रकल्प संचालक, डॉ .पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला.
२१) संचालक, महाराष्ट्र राज्य सेंद्रिय प्रमाणीकरण यंत्रणा, अकोला.
२२) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (सर्व).
२३) प्रकल्प संचालक (आत्मा) (सर्व).
२४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२५) महोलखापाल (लेखा परीक्षा) १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
२७) संशोधन संचालक (सर्व), कृषि विद्यापीठे.
२८) अवर सचिव, (व्यय-१) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९) अवर सचिव, कार्यासन १४३१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०) निवडनस्ती, कार्यासन १-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
कृषि संचालक (आत्मा) यांचे कार्यालय
(नैसर्गिक/सेंद्रिय शेती कक्ष)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५
ई मेल - mahaorganicpune@gmail.com

जा.क्र./कृआ/डॉपंदेनैशेमि/ मा.सु./ २६६२८ /२०२३
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
दिनांक :- १७/८/२०२३

प्रती,

१) विभागिय कृषि सहसंचालक
-----------------------------( सर्व )

२) प्रकल्प संचालक, (आत्मा)
---------------------(सर्व )

**विषय :- १०० टक्के राज्य पुरस्कृत डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजना अंमलबजावणी साठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..........**

संदर्भ :- १) कृ.आ.चे पत्र क्र.डॉपंदेजैशेमि/अंमलबजावणी/१७१८८/२०२३ दि.२३/०५/२०२३
२) शासन निर्णय क्र. संकीर्ण२७२२/प्र.क्र.६९/१-अे मंत्रालय मुंबई दि.२७/०६/२०२३

उपरोक्त विषयान्वये डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंमलबजावणी करीता वर्ष २०२३-२४ मध्ये गट स्थापनेबाबत मार्गदर्शक सूचना व जिल्हनिहाय स्थापन करावयाचे गट संख्यांचे जिल्हा निहाय लक्षांक संदर्भ क्र १ अन्वये कळविण्यात आले होते. तदनंतर सदर योजनेस संपूर्ण राज्यात राबविणे बाबत शासन निर्णय संदर्भ क्र २ अन्वये मान्यता दिली आहे.

त्यानुसार वर्ष २०२३-२४ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंमलबजावणी करणेसाठी योजनेतंर्गत राबविण्याच्या घटक / बाब निहाय सविस्तर मार्गदर्शक सूचना व लक्षांक सोबत सहपत्रित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनाप्रमाणे योजनेची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सोबत :- मा. आयुक्त (कृषि) यांचे मान्यतेने

( दशरथ तांभाळे )
कृषि संचालक (आत्मा)
कृषि आयुक्तालय, पुणे

प्रत :- १) प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला
१ /- यांना माहिती व कार्यवाहीस्तव
२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ( सर्व ) यांना माहितीस्तव

मार्गदर्शक सुचना

राज्य पुरस्कृत डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन मार्गदर्शक सूचना वर्ष २०२३-२४

१.प्रस्तावना -

शेतीमध्ये सातत्याने होत असलेला रसायनांचा अतिरिक्त वापरामुळे जमिनीचा पोत खालावलेला आहे. सुपीक जमीन ही निसर्गाची देणगी असून तीची योग्य काळजी घेतल्यास ती एक चिरकाल ठेवा आहे. जमिनीतील जीवसृष्टीच्या वाढीसाठी पोषक वातावरण ठेवल्यास जमिनीचे आरोग्य चांगले राहते. जमिनीचा सजीवपणा प्रामुख्याने जमिनीतील सेंद्रिय पदार्थांच्या प्रमाणावर आणि गुणवत्तेवर अवलंबून असतो. जमिनीतील सेंद्रिय कर्ब हा जमिनीच्या सुपिकतेसाठी महत्वाचा घटक असुन जमिनीमध्ये असलेल्या जिवाणुंसाठी व जीवजंतूंसाठी महत्वाचे माध्यम आहे. जमिनीतील सेंद्रिय कर्ब हा अत्यंत महत्वाचा गुणधर्म असल्याने जमिनीची सुपिकता व सच्छिद्रता, जिवाणूंची अभिक्रिया, अन्नद्रव्यांची उपलब्धता, जमिनीचे तापमान, कणांची जडणघडण, पिकांसाठी टाकण्यात येणाऱ्या खतांचे विघटन इत्यादीसाठी सेंद्रिय कर्बाची आवश्यकता असते. यासाठी साधारणत: जमिनीमध्ये १.०% पेक्षा जास्त सेंद्रिय कर्बाचे प्रमाण असणे आवश्यक आहे.

रासायनिक खतांचा अति वापर, पिकांचे अवशेष जाळणे, पिकांची योग्य फेरपालट न करणे, मशागतीच्या आयोग्य पध्दती, गाई-म्हशींचे घटते प्रमाण आणि त्यामुळे शेणखताचा कमी वापर इत्यादी कारणांमुळे जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाणात लक्षणीय घट होत असून सद्यस्थितीत सर्वसाधारणपणे ०.४० % पेक्षा कमी सेंद्रिय कर्बाचे प्रमाण असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे जमिनीचा पोत बिघडून जमिनी नापिक होणे, अशा जमिनीत रासायनिक खतांची कार्यक्षमता कमी असल्याने रासायनिक खतांच्या वापरात वाढ होणे परिणामी उत्पादन खर्च वाढणे अशा दुष्टचक्रात अडकुन उत्पादनाची शाश्वतता न राहणे इत्यादी दुष्परिणाम दिसून येत आहेत. अशा जमिनीतुन उत्पादित होणा-या मालाची पोषणमुल्ये खालावलेली आढळतात. अशा जमिनीत घेतल्या जाणा-या पिकांची किड व रोगांना प्रतिकारक्षमता कमी असल्याने रासायनिक औषधांच्या/किडनाशकांच्या अतिरीक्त वापरामुळे जमिन व पाणी प्रदुषित होते. तसेच अशा पध्दतीने पिकविलेल्या अन्नामध्ये उर्वरीत किटकनाशकांचे प्रमाण कमाल मर्यादेपेक्षा अधिक असल्याने एकाअर्थी असे अन्न मानवी आरोग्यास हानीकारक ठरते. त्यामुळे मानवी शरीराच्या प्रतिकारशक्तीवर विपरीत परिणाम होतो. प्रदुषित जमिन, पाणी आणि अन्न यांमुळे मानवाबरोबर पाळीव प्राणी, पक्षी तसेच संपुर्ण जीवसृष्टीवर विपरीत परिणाम होतो.

२. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन -

विषमुक्त अन्न, प्रदुषण विरहीत जमिन व पाणी आणि एकुणच शाश्वत कृषि उत्पादनासाठी नैसर्गिक/सेंद्रिय शेती हा पर्याय आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्यात नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी अभियान राबविणे आवश्यक आहे. याद्दष्टीने राज्यात नैसर्गिक/सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणेकरीता डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन योजनेला सन २०२२-२३ ते सन २०२७-२८ या कालवधी करिता मुदतवाढ देऊन मिशनची व्याप्ती राज्यभर वाढविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. मिशनच्या नावात बदल करून **"डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन"** असे नामकरण करण्यात आले आहे. सदर मिशनची संपुर्ण राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**मिशनचे नांव** :- डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन

**अध्यक्ष** :- आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे

**मुदत कालावधी** :- ६ वर्ष ( सन २०२२-२३ ते २०२७-२८ )

**२.१.आर्थिक तरतूद**:- योजनानिहाय आर्थिक तरतुद खालीलप्रमाणे

**केंद्र पुरस्कृत योजना व राज्य पुरस्कृत योजनांचा आर्थिक तरतूदीबाबतचा तपशिल**

| अ क्र | योजना | मापदंड (रू. प्रति हे.) | गट (संख्या) | क्षेत्र (लाख हे.) | एफपीसी (संख्या) | केंद्र हिस्सा (रु.कोटी) | राज्य हिस्सा (रु.कोटी) | एकूण (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | परंपरागत कृषि विकास योजना | ३२,१३० | ३,०५० | ०.६१ | २०३ | १२८.९२ | ८५.९५ | २१४.८६ |
| २ | राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान | २७,२५० | २,५५० | १.२८ | २५५ | २०८.४६ | १३८.९८ | ३४७.४४ |
| ३ | मोठया क्षेत्राचे प्रमाणिकरण (Large Area Certification) | ६,१२० | ० | ४.५० | ४५ | १६५.२४ | ११०.१६ | २७५.४० |
| एकूण केंद्र पुरस्कृत योजना | | | ५,६०० | ६.३९ | ५०३ | ५०२.६२ | ३३५.०८ | ८३७.७० |
| ४ | डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन - (१०० टक्के राज्य पुरस्कृत योजना) | १३,४६४ | १३,२२० | ६.६१ | १३२२ | ०.०० | १०८३.२९ | १०८३.२९ |
| एकूण एकंदर केंद्र व राज्य योजना | | -- | १८,८२० | १३.०० | १८२५ | ५०२.६२ | १४१८.३७ | १९२०.९९ |

डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत १०० टक्के राज्य पुरस्कृत योजनेकरीता रु.१०८३.२९ कोटी तरतुद आहे. मिशन अंतर्गत केंद्र पुरस्कृत योजनेकरिता केंद्र हिस्सा रु.५०२.६२ कोटी व राज्य हिस्स्यापोटी रु.३३५.०८ कोटी तरतुद आहे. असा एकुण कार्यक्रम रु.१९२०.९९ कोटीचा आहे.

**२.२.मिशन अंतर्गत खालील योजनांचा समावेश राहील .**

अ. केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषि विकास योजना (PKVY)

आ. केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषि विकास योजनेंतर्गत मोठ्या क्षेत्रावरील प्रमाणिकरण (PKVY-LAC)

इ. केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान (NMNF)

ई. राज्य पुरस्कृत डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजना (PDNSM)

**२.३.मिशनची उदिष्टे -:**

i. नैसर्गिक व सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्रात रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर थांबवून जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवुन जमिनीची सुपिकता व आरोग्य सुधारणे.

ii. रसायनमुक्त सुरक्षित, सकस व पोषणयुक्त नैसर्गिक व सेंद्रिय शेतमाल उत्पादित करणे.

iii. नैसर्गिक व सेंद्रिय शेतमालाची मुल्यसाखळी विकसित करणे

iv. नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देणे आणि कृषी विद्यापीठ व कृषी विज्ञान केंद्र यांच्या समन्वयाने नैसर्गिक व सेंद्रिय शेतीखालील क्षेत्रात वाढ करणे.

v. समुह संकल्पनेव्दारे १८,८२० उत्पादक गटांची स्थापना करणे आणि गटांचे समुह तयार करुन १,८२५ शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना करणे.

vi. शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्तरावर शेतावरील जैविक निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करुन स्थानिक पातळीवर जैविक निविष्ठा उपलब्ध करणे.

### ३. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजना समित्या

यापुर्वी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये धर्मादाय आयुक्त यांचेकडे डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन या नावाने नोंदणी करण्यात आलेली आहे. आता त्या नावात अंशत: बदल करून "**डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन**" असे नामकरण करण्यात आलेले आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत नैसर्गिक/सेंद्रिय शेती योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी खालील समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत.

**३-अ. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन नियामक मंडळ** (Mission Governing Council)

| अ.क्र | पदनाम | मिशन नियामक मंडळातील पद |
|---|---|---|
| १ | आयुक्त कृषि ,महाराष्ट्र राज्य ,पुणे | अध्यक्ष |
| २ | कृषि संचालक ,आत्मा ,कृषि आयुक्तालय ,महाराष्ट्र राज्य ,पुणे | उपाध्यक्ष |
| ३ | राज्यातील ४ कृषि विद्यापिठांचे "संशोधन संचालक" | सदस्य |
| ४ | कृषि संचालक ,फलोत्पादन ,कृषि आयुक्तालय ,महाराष्ट्र राज्य ,पुणे | सदस्य |
| ५ | कृषि संचालक ,निविष्ठा व गुणनियंत्रण ,कृषि आयुक्तालय ,महाराष्ट्र राज्य ,पुणे | सदस्य |
| ६ | कृषि संचालक ,विस्तार व प्रशिक्षण ,कृषि आयुक्तालय ,महाराष्ट्र राज्य ,पुणे | सदस्य |
| ७ | संचालक ,महाराष्ट्र सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणा ,अकोला | सदस्य |
| ८ | सेंद्रिय शेती विषयक तज्ञ (४ अशासकीय सदस्य) | सदस्य |
| ९ | प्रकल्प संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला | सदस्य सचिव |

**३-अ (i) डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन नियामक मंडळाचे अधिकार व कार्ये** -

१. मिशनबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.
२. वार्षिक आराखड्यास मान्यता देणे.
३. वर्षातुन किमान दोन वेळा बैठक घेऊन योजनेचा आढावा घेणे
४. शासनास नैसर्गिक / सेंद्रिय शेतीबाबत धोरणात्मक निर्णयासाठी शिफारशी करणे.

**३-ब. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन कार्यकारी मंडळ** (Mission Management Committee)

| अ.क्र | पदनाम | मिशन कार्यकारी मंडळातील पद |
|---|---|---|
| १ | कृषि संचालक, आत्मा कृषि आयुक्तालय ,महाराष्ट्र राज्य ,पुणे | अध्यक्ष |
| २ | प्रकल्प संचालक, डा पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला | उपाध्यक्ष |
| ३ | विभागीय संचालक, विभागीय सेंद्रिय व नैसर्गिक शेती केंद्र (RCONF), नागपुर | सदस्य |
| ४ | संचालक, कृषि तंत्रज्ञान एप्लिकेशन रिसर्च इन्स्टिट्युट (ATARI), झोन VIII, पुणे | सदस्य |
| ५ | महाराष्ट्रातील ४ कृषि विद्यापिठांचे सेंद्रिय शेती "संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख" | सदस्य |
| ६ | कार्यकारी संचालक/व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे | सदस्य |
| ७ | अधिक्षक कृषी अधिकारी, डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला | सदस्य |
| ८ | कृषि उपसंचालक, परंपरात कृषि विकास योजना, केंद्र पुरस्कृत | सदस्य |
| ९ | कृषि उपसंचालक, राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान, केंद्र पुरस्कृत | सदस्य |
| १० | कृषि उपसंचालक, डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला | सदस्य सचिव |

३-ब (i) डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन कार्यकारी मंडळाचे अधिकार व कार्ये

१. वार्षिक आराखडा तयार करणे.

२. विविध योजनांचे अभिसरण (Convergence)करणे .

३. योजना अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे.

४. विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधणे.

५. वर्षनिहाय व घटकनिहाय तरतुदीमधील बदलास मान्यता देणे.

६. योजना अंमलबजावणीसाठी तांत्रिक शिफारशी करणे आणि मार्गदर्शक सूचना तयार करणे.

३-क. जिल्हा मिशन व्यवस्थापन समिती

| अ.क्र | पदनाम | मिशन व्यवस्थापन समिती पद |
|---|---|---|
| १ | प्रकल्प संचालक, आत्मा | अध्यक्ष |
| २ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सहअध्यक्ष |
| ३ | जिल्ह्यातील कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ | सदस्य |
| ४ | नैसर्गिक/सेंद्रिय शेतीमध्ये काम करणारे शेतकरी उत्पादक कंपन्यांचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | प्रकल्प उपसंचालक/तंत्र अधिकारी (सेंद्रिय शेती) | सदस्य सचिव |

३-क (i). जिल्हा मिशन व्यवस्थापन समितीचे अधिकार व कार्ये.

१. जिल्ह्याचा वार्षिक आराखडा तयार करणे.

२. जिल्ह्यांतर्गत विविध योजनांचे अभिसरण (Convergence) करणे.

३. जिल्ह्यात योजनेची अंमलबजावणी करणे.

४. विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधणे.

५. वर्षनिहाय व घटकनिहाय तरतुदीमधील बदलाबाबत शिफारस करणे.

**४. अंमलबजावणी यंत्रणा -**

डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत सर्व चारही योजना राबविण्यासाठी प्रकल्प संचालक, आत्मा हे अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम पाहतील. क्षेत्रिय पातळीवर योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपविभागीय कृषि अधिका-यांपासुन कृषि सहाय्यकांपर्यंत संपुर्ण यंत्रणा प्रकल्प संचालक, आत्मा यांचे सुचनेनुसार काम करेल. प्रकल्प संचालक, आत्मा यांनी त्यांना देण्यात आलेल्या समूहाच्या लक्षांकापैकी एक समूह स्थापन करण्याचे लक्षांक प्रत्येक कृषि विज्ञान केंद्र यांना द्यावे. तसेच कृषि विद्यापीठ यांनाही समुह स्थापन करण्याचा लक्षांक देण्यात यावा. कृषि विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन जिल्हा मिशन व्यवस्थापन समितीकडे सादर करावा व जिल्हा व्यवस्थापन समितीने त्यास मान्यता द्यावी.

केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषि विकास योजना अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सुचना यापुर्वी कृषि आयुक्तालयस्तरावरून निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

१. परंपरागत कृषि विकास योजना वर्ष २०२२-२३ (५०० गट)- जा.क्र १५०९५/२३ दि. ३ मे, २०२३.

२. परंपरागत कृषि विकास योजना वर्ष २०२३-२४ (८५०गट) -जा.क्र २२०७३/२३ दि.४ जुलै, २०२३.

३. केंद्र पुरस्कृत पंरपरागत कृषि विकास योजनेंतर्गत मोठ्या क्षेत्रावरील प्रमाणिकरण आणि राष्ट्रीय नैसर्गिक शेती

अभियान या दोन योजनांचे मार्गदर्शक सुचना नंतर देण्यात येतील.

४. राज्य पुरस्कृत (१०० टक्के) डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेच्या अंतरीम मार्गदर्शक सुचना यापुर्वी कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.१७१८८/२३ दि. २३ मे, २०२३ नुसार देण्यात आल्या होत्या.

त्याअनुषंगाने डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठीच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

शासन निर्णयामध्ये नमुद असलेले १३,३२० गटांची स्थापना करणेसाठी जिल्हास्तरावर लक्षांक देण्यात आलेला आहे. त्यानुसार जिल्हा, तालुका, गाव व शेतकरी निवडीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**५. शेतकरी निवड, गट व कंपनी/सोसायटी स्थापना -**

I.**जिल्हा लक्षांक**- जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या लक्षात घेऊन **परिशिष्ठ-१** मध्ये नमुद केल्याप्रमाणे जिल्हानिहाय वर्षनिहाय गटांचे लक्षांक देण्यात आलेला आहे. एका गटामध्ये एकूण अनुदानीत क्षेत्र ५० हे. च्या कमाल मर्यादेत राहील असे गृहीत धरून गटांचे लक्षांक देण्यात आले आहे. तथापि प्रत्यक्षात एका गटात राज्यातील भौगोलिक क्षेत्र आणि तेथील सरासरी जमिन धारणेनुसार प्रत्येक गट ५० हेक्टर क्षेत्राचा मिळेलच असे नाही, म्हणुन गटांची संख्या अधिक होऊ शकते परंतु प्रत्यक्ष लक्षांक साध्य करताना ५० हेक्टरचा एक गट गृहीत धरून जितके क्षेत्र येते तितके त्या जिल्ह्याचे क्षेत्राचे लक्षांक राहील. गट स्थापन करताना कोकण विभागात किमान १० हेक्टरचा एक गट आणि उर्वरीत महाराष्ट्रात किमान २५ हेक्टरचा एक गट याप्रमाणे गटांची स्थापना करावी आणि वर नमुद केल्याप्रमाणे अधिकतम ५० हेक्टरचा एक गट असावा. अशा रितीने नव्याने स्थापन केलेल्या गटांची नोंदणी आत्मा अंतर्गत करावी. यापुर्वी आत्मा अंतर्गत नोंदणीकृत गटांनाही योजनेचा लाभ देता येईल.

II.**तालुक्यांची निवड**- केंद्र व राज्य पुरस्कृत नैसर्गिक/सेंद्रिय योजना (वर्ष २०२२-२३ व २०२३-२४) राबविलेली गावे वगळुन तालुक्यातील इतर गांवामध्ये एका किंवा लगतच्या गांवात गटांची स्थापना करून योजना राबवावी. केंद्राची आणि राज्याची योजना एकाच गावात राबवु नये.

III.**गावांची निवड** - योजनेबाबत क्षेत्रिय अधिका-यांच्या माध्यमातुन तसेच विविध समाज माध्यमे, कार्यालयाचे आणि ग्रामपंचायतीचे नोटीस बोर्ड इ. माध्यमातुन योजनेबाबत जनजागृती करावी. सेंद्रिय शेतीबाबतचे निकष व अटी पाळुन योजनेत सहभागी होण्यास इच्छुक शेतक-यांची संख्या अधिक असलेल्या (शक्यतो किमान एक गट स्थापण्यास पुरेशी शेतकरी संख्या) गावांची निवड प्राधान्याने करावी. एका गावात किमान एक गट स्थापन करण्यासाठी पुरेशे शेतकरी उपलब्ध न झाल्यास शेजारच्या गावातील शक्यतो सलग शिवारातील शेतकरी निवडुन गटाची स्थापना करावी. ज्या गावात यापूर्वी सेंद्रिय शेतीबाबत जागरुकता आहे किंवा किमान काही शेतकरी नैसर्गिक/सेंद्रिय शेती पध्दतीचा अवलंब करतात अशी गावे प्राधान्याने निवडावीत. ५०० हेक्टरचा एक समुह स्थापन करण्यासाठी एका मंडळातील किंवा शक्यतो सलग भौगोलिक क्षेत्र असलेल्या शेजारच्या

मंडळातील गावाच्या क्षेत्राची योजनेसाठी निवड करावी. एकुणच भौगोलिकदृष्ट्या सलग क्षेत्रात समुह स्थापन होईल असे पहावे.

IV. **शेतकऱ्यांची निवड** - योजनेत एका शेतक-याला एक हेक्टर च्या मर्यादेत अनुदान देय राहील. योजनेत सहभागी शेतकऱ्यांना नैसर्गिक/सेंद्रिय प्रमाणीकरणासाठी निवडलेल्या क्षेत्रात शेती करताना कोणत्या निविष्ठा वापरता येतात व कोणत्या नाही याबाबत पुरेशी जनजागृती करून,सेंद्रिय शेतीचे महत्व पटवुन सांगावे आणि तदनंतर रासायनिक खते, औषधे इ.वापर का करता येणार नाही हे पटवुन द्यावे. तदनंतर सेंद्रिय प्रमाणीकरणासाठी आवश्यक शेती पद्धतीचा अवलंब करण्यास स्वेच्छेने तयार असलेल्या शेतक-यांची निवड करावी. सेंद्रिय शेतीचे महत्व शेतकऱ्यांना पटवून देऊन जे शेतकरी अशी शेती करण्यास स्वेच्छेने तयार होतील त्या शेतकऱ्यांचा गटात सहभाग करावा. यापूर्वीच सेंद्रिय शेतीबद्दल जागृत असलेल्या शेतकऱ्यांचा योजनेत प्राथम्याने सहभाग करावा. अनुसूचित जाती,अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील त्या त्या जिल्ह्यातील या प्रवर्गाच्या शेतकऱ्यांच्या प्रमाणात किमान शेतकऱ्यांची योजनेसाठी निवड होईल याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देवून किमान ३० टक्के पर्यंत महिलांचा योजनेत सहभाग राहील असे पहावे (कुटुंबात महिलांच्या नावे शेती नसेल आणि कुटुंबातील अन्य व्यक्तीच्या नावे शेती असल्यास अशा कुटुंबातील महिलांचा गटात सदस्य म्हणुन सहभाग करता येईल).

V.**गटांची स्थापना** - निवडलेल्या गावात/एका गावात किमान एक किंवा त्याहून अधिक गट स्थापन करता येतील. यापुर्वी आत्माकडे नोंदणीकृत गट या योजनेसाठी निवडता येतील. एका गटामध्ये एकूण अनुदानीत क्षेत्र ५० हे. च्या कमाल मर्यादेत राहील असे ग्रहीत धरून गटांचे लक्षांक देण्यात आले आहे. तथापि प्रत्यक्षात एका गटात राज्यातील भौगोलिक क्षेत्र आणि तेथील सरासरी जमिन धारणेनुसार प्रत्येक गट ५० हेक्टर क्षेत्राचा मिळेलच असे नाही, म्हणुन गटांची संख्या अधिक होऊ शकते परंतु प्रत्यक्ष लक्षांक साध्य करताना ५० हेक्टरचा एक गट गृहीत धरून जितके क्षेत्र येते तितके त्या जिल्ह्याचे क्षेत्राचे लक्षांक राहील. गट स्थापन करताना कोकण विभागात किमान १० हेक्टरचा एक गट आणि उर्वरीत महाराष्ट्रात किमान २५ हेक्टरचा एक गट याप्रमाणे गटांची स्थापना करावी. अशा रीतीने प्रत्येक जिल्ह्यात दिलेल्या क्षेत्राच्या लक्षंकानुसार आवश्यक गटांची स्थापना करून त्या गटांची आत्मा यंत्रणेकडे नोंदणी करावी आणि प्रत्येक गटाचे राष्ट्रियकृत बँकेत खाते उघडावे.

VI.**समुहस्तरावर शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीची स्थापना** - निवडलेल्या ५०० हेक्टरच्या समुहातील गावामधिल स्थापन केलेल्या शेतकरी गटांची (५० हे. च्या किमान १० गटांचा समुह करून) एक स्वतंत्र नवीन कंपनी स्थापन करावी किंवा त्या गावांमध्ये अस्तित्वात असलेल्या कंपनीमध्ये नैसर्गिक/सेंद्रिय शेती करणा-या शेतक-यांचा समावेश करावा. नव्याने स्थापित अथवा अस्तित्वात असलेल्या गटांतील सर्व शेतक-यांचा सामवेश कंपनीमध्ये भागधारक म्हणुन करून घेणे अनिवार्य राहील. कंपनीने तयार केलेल्या घटनेमध्ये नैसर्गिक/सेंद्रिय शेती विषय सामवेश करणे गरजेचे आहे.कंपनी कायद्याखाली शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी करावी लागते तथापि योजनेत सहभागी शेतकरी बहुसंख्येने कंपनी ऐवजी सहकारी संस्था स्थापन करू इच्छित असतील तर राज्य सरकारच्या सहकार कायद्याखाली सहकारी संस्था स्थापन करता येईल.

## ६. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत राबविण्यात येणारे घटक खालीलप्रमाणे

| अ.क्र | घटक | मापदंड (रूपये) (रू. प्रति हे.) |
|---|---|---|
| १ | नैसर्गिक सेंद्रिय शेती-क्षेत्र विस्तार व शेतकरी प्रशिक्षण | ७,००० |
| २ | शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे व त्यांचे प्रशिक्षण | १,००,००० |
| ३ | शेतावरील जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (On farm Bio-Input Resource Centre) | |
| | अ) शेतकरी उत्पादक कंपनी स्तरावर जैविक निविष्ठा केंद्र | ५,००,००० |
| | ब) शेतकरी गट स्तरावर जैविक निविष्ठा केंद्र | २,००,००० |
| ४ | शेतकरी उत्पादक कंपन्यांना पणन सुविधेसाठी अर्थसहाय्य | ५,००,००० |
| ५ | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष - रू. १५७०२.०० लाख मंजुर तरतूद (मिशनस्तर) | --- |
| ६ | कृषि विज्ञान केंद्रामार्फत कल्चर निर्मिती केंद्र, प्रात्यक्षिक, कर्मचारी व शेतकरी प्रशिक्षण (४५ केव्हीके) | रू. २५.०० लाख प्रति केव्हीके |
| ७ | कृषि विद्यापीठ स्तरावर स्थापित सेंद्रिय संशोधन केंद्रास अर्थसहाय्य (४ विद्यापीठ) | रु. ५००.०० लाख प्रति विद्यापीठ |

### ६.१ घटक -नैसर्गिक सेंद्रिय शेती - क्षेत्रविस्तार व शेतकरी प्रशिक्षण -

राज्यातील नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस चालना देण्यासाठी या घटकांतर्गत उपलब्ध प्रति हेक्टर रू.७०००/- तरतूदीतुन खालील उपघटकावर खर्च करावयाचा आहे.

| अ.क्र | उपघटक | मापदंड प्रति हे. रूपये | ५० हे. च्या गटासाठी तरतूद रूपये | ५०० हे. च्या समुहासाठी तरतूद रूपये |
|---|---|---|---|---|
| अ | शेतकरी/अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण | १,५०० | ७५,००० | ७,५०,००० |
| ब | शेतकऱ्यांच्या शेतावर निविष्ठा निर्मिती (शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान) | ३,५०० | १,७५,००० | १७,५०,००० |
| क | शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी समभागासाठी अनुदान | १,००० | ५०,००० | ५,००,००० |
| ड | नैसर्गिक/सेंद्रिय शेती प्रमाणीकरण | १,००० | ५०,००० | ५,००,००० |
| एकुण | | ७,००० | ३,५०,००० | ३५,००,००० |

### ६.१ अ) उपघटक- शेतकरी/कर्मचारी/अधिकारी प्रशिक्षण -

नैसर्गिक/सेंद्रिय शेतीमध्ये शेतक-यांचे मन परिवर्तन होणे आणि संपुर्ण यंत्रणेचे योग्य प्रशिक्षण होणे या दृष्टीने मनुष्यबळ विकासाचे व्यापक धोरण महत्वाचे आहे त्यादृष्टीने राज्यस्तरापासुन शेतक-यांच्या स्तरापर्यंत प्रशिक्षणाचे धोरण खालीलप्रमाणे असेल.

I. **राज्यस्तर** - राज्यस्तरावरून राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था (National Institute of Plant Health Management - NIPHM) या संस्थेबरोबर सामांजस्य करार करून या योजनेसाठी

काम करणा-या कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना राज्यातील कृषि विद्यापिठे, कृषि विज्ञान केंद्रे या संस्थेमध्ये प्रशिक्षण दिले जाईल.

II. **कृषि विद्यापिठांतर्गत सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र** : या योजनेतुन सदर केंद्राच्या विकासासाठी तसेच संशोधन व प्रशिक्षणासाठी रू. ५.०० कोटी प्रति कृषि विद्यापिठ इतकी तरतूद तीन वर्षाकरीता करण्यात आलेली आहे. या केंद्रामार्फत राज्यातील कृषि विज्ञान केंद्रे, योजनेत प्रत्यक्षरित्या काम करणारे अधिकारी,कर्मचारी आणि निवडक शेतक-यांना प्रशिक्षण दिले जाईल. या योजनेमध्ये दिल्या जाणा-या प्रशिक्षणाचे मोड्युल्स उपलब्ध करून देणे.

III. **कृषि विज्ञान केंद्रे** : या योजनेत स्थापन करण्यात आलेल्या शेतकरी गटांचे गट प्रवर्तक शेतकरी, गटाशी संबंधित क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांचे प्रशिक्षण कृषि विज्ञान केंद्रामार्फत घेण्यात येईल. या योजनेतुन कृषि विज्ञान केंद्रावर सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके उभी करणे प्रशिक्षण देणे यासाठी रू. २५.०० लाख प्रति कृषि विज्ञान केंद्र तरतूद तीन वर्षाकरीता करण्यात आलेली आहे.

IV. **शेतकरी प्रशिक्षणे** : शेतक-यांचे गावपातळीवर प्रशिक्षण कृषि विभागातील/आत्मा अंतर्गत कर्मचारी आणि कंत्राटी पध्दतीने नियुक्त तज्ञ प्रशिक्षकामार्फत घेण्यात येईल. त्याशिवाय कृषि विज्ञान केंद्रे आणि प्रशिक्षण देण्यास सक्षम असलेल्या अन्य संस्थामार्फत ही शेतक-यांचे प्रशिक्षण घेण्यात येईल.

अशारीतीने ४ स्तरावर मनुष्यबळ विकासाचे काम केले जाईल.

गटातील शेतक-यांचे प्रत्येक वर्षात हंगामानुसार ४ प्रशिक्षणे आयोजित करावयाचे असुन त्यापैकी ३ प्रशिक्षणे गावपातळीवर आयोजित करायचे आहे. यासाठी ५० हे. च्या शेतक-यांना प्रति प्रशिक्षण रू. ५०००/- तरतूद राहील. ४ प्रशिक्षणापैकी १ प्रशिक्षण हे कृषि विज्ञान केंद्र स्तरावर आयोजित करावयाचे असुन त्यासाठी रू. १०,०००/- तरतूद राहील.

कृषि विज्ञान केंद्र स्तरावरील प्रशिक्षण आयोजित करताना किंवा गावस्तरावरील प्रशिक्षण आयोजित करताना समुहातील ४-५ शेतकरी गटांचे एकसत्री प्रशिक्षण नियोजन करून आयोजीत करावे. जेणेकरून सदर प्रशिक्षणामधिल आयोजित करावयाची प्रात्यक्षिके व इतर संसाधनाचा पुरेपुर योग्य वापर होईल.

६.१ अ (i) उपघटक - अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण

| उपघटक | परिमाण | उपलब्ध तरतुद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण | प्रति हेक्टर | १०० | ४० | ४० | २० |
| | प्रति गट (५० हेक्टर) | ५०,०० | २००० | २००० | १००० |
| | प्रति समुह (१० गटांचे ५०० हे.) | ५०,००० | २०००० | २०००० | १०००० |

उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणा-या तरतूदीतुन राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था )National Institute of Plant Health Management - NIPHM), कृषि विद्यापिठांतर्गत सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्रे, कृषि विज्ञान केंद्रे आणि आवश्यकतेनुसार अन्य राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण संस्थांमध्ये अधिकारी/

कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात येईल. याबाबतचा प्रशिक्षण कार्यक्रम दरवर्षी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनमार्फत संचालक, आत्मा यांना सादर करण्यात येईल.

**६.१. अ (ii) उपघटक -शेतकरी प्रशिक्षण**

| घटक | परिमाण | उपलब्ध तरतुद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| शेतकरी प्रशिक्षण | प्रति हेक्टर | १,४०० | ५०० | ५०० | ४०० |
| | प्रति गट (५० हेक्टर) | ७०,००० | २५,००० | २५,००० | २०,००० |
| | प्रति समुह (१० गटांचे ५०० हे.) | ७,००,००० | २,५०,००० | २,५०,००० | २,००,००० |

या घटकासाठी पहिल्या दोन वर्षात रक्कम रू. ५००/- प्रति हेक्टर प्रमाणे आणि तिस-या वर्षी रू. ४००/- प्रति हेक्टर प्रमाणे तरतूद उपलब्ध राहील. म्हणजेच पहिल्या दोन वर्षात प्रति वर्ष प्रति गट रू. २५००/- उपलब्ध होतील आणि तीस-या वर्षी प्रति गट रू. २०,०००/- तरतूद उपलब्ध राहील.

**पहिल्या वर्षीचे शेतकरी प्रशिक्षण -**

प्रथम वर्षात सुरवातीला एक प्रशिक्षण कृषि विज्ञान केंद्र किंवा अन्य संस्थेच्या स्तरावर घ्यावे. तदनंतर गावपातळीवर तीन शेतकरी प्रशिक्षणे घ्यावीत (पहिले, दुसरे, तीसरे). गावपातळीवरील प्रशिक्षणे घेण्याची जबाबदारी संबंधित कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषि अधिकारी/बीटीएम/एटीएम यांची राहील. या अधिकारी/कर्मचा-यांना कृषि विज्ञान केंद्र किंवा अन्य संस्थास्तरावरील पहिल्या प्रशिक्षणात सेंद्रिय शेतीबाबत प्रशिक्षण देण्यात येईल. पहिल्या प्रशिक्षणातील माहीती आणि अन्य स्त्रोतातुन ज्ञान प्राप्त करून घेऊन गावपातळीवरील प्रशिक्षणे या अधिकारी/कर्मचा-यांमार्फत आयोजित करावीत. तसेच सदर प्रशिक्षणासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणुन प्रशिक्षित मास्टर ट्रेनर, चॅम्पियन शेतकरी, समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) किंवा नैसर्गिक व सेंद्रिय शेती करणारे शेतकरी, तसेच कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ यांचा सहभाग घेता येईल.

**६.१. अ (ii) A. कृषि विज्ञान केंद्रे अथवा अन्य संस्थेमार्फत घ्यावयाचे प्रशिक्षण** - सदर दोन दिवसाचे प्रशिक्षण कृषि विज्ञान केंद्र किंवा अन्य संस्थास्तरावर आयोजित करण्यात यावे .सदर प्रशिक्षणास योजनेत तयार झालेल्या गटांचे प्रमुख व अन्य मिळुन प्रति गट ४ शेतकरी याप्रमाणे प्रति समुह शेतकरी ४० प्रशिक्षणासाठी उपस्थित राहतील. त्याशिवाय गट स्थापनेसाठी सक्रीय असलेले कर्मचारी, गटांच्या कार्यक्षेत्रातील मंडळ कृषि अधिकारी आणि त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचेपैकी एकुण प्रशिक्षणार्थी प्रति समुह ४ उपस्थित राहतील.

| अ क्र | प्रशिक्षण (दोन दिवसीय -निवासी) खर्चाची बाब | प्रति प्रशिक्षणार्थी प्रती दिन मापदंड रू. | कालावधी (दिवस) | प्रति गट निवडावयाचे प्रशिक्षणार्थी | प्रति समुह (कंपनी/सोसायटी) निवडावयाचे प्रशिक्षणार्थी | प्रति समुह (कंपनी/सोसायटी) उपलब्ध तरतूद रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शेतकरी प्रशिक्षण (निवास व्यवस्था, भोजन, अल्पोपहार, प्रशिक्षण साहीत्य व प्रशिक्षण आयोजनासाठी संस्थेस येणारा खर्च) | १,००० | २ | ४ | ४० | ८०,००० |
| २ | शेतकरी प्रवास खर्च (येणे-जाणे एकुण) | ३०० (एकुण) | - | ४ | ४० | १२,००० |
| ३ | अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण | १००० | २ | - | ४ | ८,००० |
| | एकुण | | | | ४४ | १,००,००० |

सदर प्रशिक्षण खरीप हंगामपूर्व मे-जुन महिन्यात पेरणीपूर्वी घेण्यात यावे. तथापि वर्ष २०२३-२४ मध्ये योजनेची सुरवात उशीरा झाल्याने प्रशिक्षण कार्यक्रमाच्या वेळापत्रकात आवश्यकतेनुसार बदल करावा. सदर प्रशिक्षणामध्ये पुढील विषयांचा अंतर्भाव असावा.

I. योजनेची व सेंद्रिय शेतीची संकल्पना उद्देश आणि कार्यपध्दती
II. नैसर्गिक व सेंद्रिय शेती पशुधनाचे महत्व बीजामृत तयार करून बीजप्रक्रीया करण्याचे प्रात्यक्षिक
III. या योजनेतुन समुहस्तरावर करावयाच्या FPO कंपनी अथवा सोसायटी बाबत संकल्पना व कार्यपध्दती
IV. पिक नियोजन, सापळा पिके, आंतरपिक लागवड, मुलस्थानी जलसंधारण, माती व पाणी परिक्षणाचे महत्व स्वनिर्मित निविष्ठा उत्पादन व वापर
V. पिक अवशेषांचे कंपोस्ट करणे इ. बाबत माहीती.
VI. नैसर्गिक शेती करण्यासंबंधीचे शपथपत्राबाबत माहीती (शेतकरी दैनंदिनीतील नमुन्यात)
VII. नैसर्गिक व सेंद्रिय शेती पध्दतीनुसार किड व रोग नियंत्रणासाठी निविष्ठा उत्पादन व वापर, तण नियंत्रण, कामगंध सापळे, पिवळे चिकट सापळे, पक्षी थांबे इ. चा वापर
VIII. सेंद्रिय प्रमाणीकरण पद्धत, सूक्ष्म जीवाणूंचा वापर, शेतकरी दैनंदिनीत नोंदी करणे, सेंद्रिय माल व्यवसाय आराखडा इ. विषयांचा प्रशिक्षणात समावेश करावा.
IX. स्वनिर्मित सेंद्रिय पध्दतीची पिक वृध्दीवर्धके (PGR) (उदा. मत्स्यजनीत व अंडेजनीत ॲमीनो ॲसीड, पंचगव्ये इ.), शेतातील किड व रोग निरीक्षण व सर्वेक्षण, नैसर्गिक व सेंद्रिय पध्दतीनुसार किड व रोग नियंत्रणासाठी निविष्ठा उत्पादन व वापर प्रात्यक्षिकासह
X. नैसर्गिक व सेंद्रिय प्रमाणीकरण मानके, शेतकरी दैनंदिनीत नोंदी करणे, पुढील हंगामाची पूर्व तयारी व नियोजन

**६.१. अ (ii) B. गावपातळीवरील तीन शेतकरी प्रशिक्षणे (पहिले, दुसरे, तीसरे)** (रक्कम रू.)

| गावपातळीवरील प्रशिक्षण | प्रति हेक्टर उपलब्ध तरतूद | प्रति गट उपलब्ध तरतूद | प्रति समुह उपलब्ध तरतूद |
|---|---|---|---|
| पहिले | १०० | ५००० | ५०००० |
| दुसरे | १०० | ५००० | ५०००० |
| तीसरे | १०० | ५००० | ५०००० |
| **एकुण** | | | १५०००० |

गावपातळीवर पहिल्या वर्षात प्रत्येक गटाची तीन प्रशिक्षणे विभागातील अधिकारी/कर्मचा-यांमार्फत घ्यावयाची आहेत. प्रत्येक प्रशिक्षण सत्राचे आयोजन करताना **दोन गटांचे** (५० हे. चा एक गट या लक्षांकानुसार) एकत्रित प्रशिक्षण आयोजित करावे, म्हणजेच यासाठी दोन गटांचे मिळुन एका प्रशिक्षण सत्राला रू .१०,०००/- उपलब्ध होतील. प्रशिक्षणासाठी अनुदानाच्या उपलब्धतेनुसार क्षेत्रिय अधिकारी/कर्मचा-यांना अग्रीम द्यावा. प्रशिक्षणास उपस्थित अधिकारी,कर्मचारी आणि शेतकरी यांचा हजेरीपट ठेवणे, जिओ-टॅग फोटोसह अहवाल देणे बंधनकारक राहील. याबाबत सद्या ऑफलाईन माहीती मार्गदर्शक सुचनांसोबत दिलेल्या प्रपत्र- १ ते ५ मध्ये द्यावी आणि ती जिल्हास्तरावर संकलित करून मिशन व संचालक आत्मा कार्यालयास सॉफ्ट कॉपी पाठवावी. MIS प्रणाली विकसित झालेनंतर नियमित माहीती ऑनलाईन सादर करणे आवश्यक राहील.

**प्रशिक्षणात खालील दिलेल्या बाबीवर खर्च करता येईल.**

१. अल्पोपहार व्यवस्था

२. प्रशिक्षण सुविधा, हॉल भाडे, ध्वनीक्षेपण, एलसीडी प्रोजेक्टर भाडे

३. प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक साहित्य

४. प्रशिक्षकांचे मानधन

५. आवश्यकता भासल्यास शेतकऱ्यांचा प्रवास खर्च (गट वेगवेगळया दुरच्या गाववात असल्यासच)

६. इतर अनुषंगीक बाबी

**पहिले प्रशिक्षण (गावपातळीवर)** - प्रशिक्षण खरीप हंगामपूर्व मे/जुन महिन्यात पेरणीपूर्वी घेण्यात यावे. तथापि वर्ष २०२३-२४ मध्ये योजनेची सुरवात उशीरा झाल्याने प्रशिक्षण कार्यक्रमाच्या वेळापत्रकात आवश्यकतेनुसार बदल करावा. सदर प्रशिक्षणामध्ये **पुढील विषयांचा** अंतर्भाव असावा.

I. योजनेची व सेंद्रिय शेतीची संकल्पना उद्देश आणि कार्यपध्दती

II. नैसर्गिक व सेंद्रिय शेती पशुधनाचे महत्व बीजामृत तयार करून बीजप्रक्रीया करण्याचे प्रात्यक्षिक

III. या योजनेतुन समुहस्तरावर करावयाच्या FPO **कंपनी अथवा सोसायटी** बाबत संकल्पना व कार्यपध्दती

IV. पिक नियोजन, सापळा पिके, आंतरपिक लागवड, मुलस्थानी जलसंधारण, माती व पाणी परिक्षणाचे महत्व स्वनिर्मित निविष्ठा उत्पादन व वापर

V. पिक अवशेषांचे कंपोस्ट करणे इ. बाबत माहीती.

VI. नैसर्गिक शेती करण्यासंबंधीचे शपथपत्राबाबत माहीती (शेतकरी दैनंदिनीतील नमुन्यात)

**दुसरे प्रशिक्षण (गावपातळीवर)**- प्रशिक्षण खरीप हंगामात जुलै/ऑगस्ट महिन्यात घेण्यात यावेत व त्यात **पुढील विषयांचा** अंतर्भाव असावा

I. नैसर्गिक व सेंद्रिय शेती पध्दतीनुसार किड व रोग नियंत्रणासाठी निविष्ठा उत्पादन व वापर,

II. तण नियंत्रण, कामगंध सापळे, पिवळे चिकट सापळे, पक्षी थांबे इ. चा वापर

III. सेंद्रिय प्रमाणीकरण पद्धत, सूक्ष्म जीवाणूंचा वापर, शेतकरी दैनंदिनीत नोंदी करणे,

IV. सेंद्रिय माल व्यवसाय आराखडा

V. नैसर्गिक व सेंद्रिय पध्दतीचे काढणी पश्चात तंत्रज्ञान, साठवणूक, मालाची प्रतवारी, विपणन व्यवस्थापन, सेंद्रिय माल व्यवसाय आराखडयानुसार विपणनासाठी असलेले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानके इ.

**तीसरे प्रशिक्षण (गावपातळीवर) –** प्रशिक्षण सप्टेंबर/ऑक्टोबर महिन्यात घेण्यात यावेत व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा

I. स्वनिर्मित सेंद्रिय पध्दतीची पिक वृध्दीवर्धके (PGR) (उदा. मत्स्यजनीत व अंडेजनीत ॲमीनो ॲसीड, पंचगव्ये इ.),
II. शेतातील किड व रोग निरीक्षण व सर्वेक्षण,
III. नैसर्गिक व सेंद्रिय पध्दतीनुसार किड व रोग नियंत्रणासाठी निविष्ठा उत्पादन व वापर प्रात्यक्षिकासह,
IV. नैसर्गिक व सेंद्रिय प्रमाणीकरण मानके, शेतकरी दैनंदिनीत नोंदी करणे,
V. पुढील हंगामाची पूर्व तयारी व नियोजन करणे इ. विषयांचा प्रशिक्षणात समावेश करावा.
VI. शेतकरी उत्पादक कंपनी व गटांचे ऑडीट,
VII. अभिलेख व्यवस्थापन, सेंद्रिय प्रमाणीकरण यंत्रणेने दिलेल्या त्रुटींची पूर्तता व करावयाच्या सुधारणा,
VIII. पॅकेजिंग व ब्रँडींग, शेतकरी उत्पादक कंपनीसाठी असलेल्या शासकीय योजना व त्याचे अभिसरण इ.

वरील प्रशिक्षणाबाबत नियोजन करताना स्थानिक परिस्थितीनुसार व गरजेनुसार विषयामध्ये बदल करता येईल. प्रशिक्षणाचे पूर्व नियोजन प्रकल्प संचालक, आत्मा यांनी कृषि संचालक, आत्मा व प्रकल्प संचालक,डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन यांना कळवावे.

**दुस-या आणि तीस-या वर्षाच्या प्रशिक्षणामध्ये शेतमाल स्वच्छता, पॅकींग, ब्रँडिंग, विपणन, शेतमाल विक्री केंद्राचे व्यवस्थापन, जैविक निविष्ठा संसाधन केंद्र, उत्पादन व व्यवस्थापन, शेतकरी उत्पादक कंपनी/संस्था यांचे व्यवस्थापन व शेती पुरक व्यवसाय करावयाच्या उपक्रमाविषयी या प्रशिक्षणामध्ये समावेश असणे अभिप्रेत असुन याबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना नंतर देण्यात येतील.**

**६.१.ब ) उपघटक - शेतकऱ्यांच्या शेतावर निविष्ठा निर्मिती (शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान)**

| उपघटक | परिमाण | उपलब्ध तरतुद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| शेतकऱ्यांच्या शेतावर निविष्ठा निर्मिती | प्रति हेक्टर | ३,५०० | १,५०० | १,००० | १,००० |
| | प्रति गट (५० हेक्टर) | १,७५,००० | ७५,००० | ५०,००० | ५०,००० |
| | प्रति समुह (१० गटांचे ५०० हे.) | १७,५०,००० | ७,५०,००० | ५,००,००० | ५,००,००० |

वर्षनिहाय करावयाच्या बाबी व देय अनुदान खालीलप्रमाणे

| वर्ष | प्रति हेक्टर देय अनुदान (रक्कम रू.) | शेतक-याने करावयाच्या बाबी | | अनुदान अदा करण्यासाठी अटी |
|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य बाबी | अन्य पर्यायी बाबी | |
| पहिले | १,५०० | १. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी स्थापित गटाचा सदस्य असणे<br>२. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी स्वेच्छेने तयारी दर्शवुन त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र देणे<br>३. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी स्वत: किंवा कुटुंबाने धारण केलेले क्षेत्र निश्चित करून त्याचे जिओ-टॅगिंग करणे.<br>४. शेतकरी प्रशिक्षणात सहभागी होणे.<br>५. माती परिक्षण करून घेणे | १.हिरवळीच्या खतासाठी ढेंचा, ताग लागवड<br>२. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी निश्चित केलेल्या क्षेत्राभोवती चर काढुन अन्य क्षेत्रातुन पाणी वाहुन येऊ नये याची व्यवस्था करणे.<br>३. जैविक बीजप्रक्रीया करणे<br>४. बायोडायनामिक/ सुधारीत पध्दतीने सेंद्रिय खत निर्मितीसाठी डेपो लावणे<br>५. बीजामृत जीवामृत आणि वनस्पतीजन्य किडनाशक व रोगनाशक औषधीद्रव्य तयार करण्यासाठी प्लास्टीक ड्रम खरेदी करणे, निर्मिती करणे व वापर करणे<br>६. शेता भोवताली जैविक कुंपन तयार करणे<br>७. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्रात रासायनिक खते, किटकनाशके आणि सेंद्रिय शेतीसाठी वर्ज्य निविष्ठांचा वापर ५० टक्केनी खरीपात व ७५ टक्के रब्बीमध्ये कमी करणे | १.अनिवार्य बाबींचे १०० टक्के पालन आणि त्याचे गट प्रमुखाकडुन प्रमाणिकरण (प्रपत्र)<br>२. अन्य पर्यायी ७ बाबींपैकी किमान तीन बाबींची अंमलबजावणी व त्याचे गटप्रमुखाकडुन प्रमाणिकरण (प्रपत्र) |
| दुसरे | १,००० | १. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्रात रासायनिक खते, किटकनाशके आणि सेंद्रिय शेतीसाठी वर्ज्य निविष्ठांचा वापर बंद करणे.<br>२. समुहस्तरावर स्थापित शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीचा भागधारक होणे.<br>३. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्राची सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी नोंदणी करणे.<br>४. नैसर्गिक/सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी नियुक्त यंत्रणेस सर्व प्रकारचे सहकार्य करणे.<br>५. नैसर्गिक/सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी आवश्यक सेंद्रिय शेतीच्या कामाच्या नोंदी शेत नोंद वहीमध्ये घेणे. | १.हिरवळीच्या खतासाठी ढेंचा, ताग लागवड<br>२. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी निश्चित केलेल्या क्षेत्राभोवती चर काढुन अन्य क्षेत्रातुन पाणी वाहुन येऊ नये याची व्यवस्था करणे.<br>३. जैविक बीजप्रक्रीया करणे<br>४. बायोडायनामिक/ सुधारीत पध्दतीने सेंद्रिय खत निर्मितीसाठी डेपो लावणे<br>५. बीजामृत जीवामृत आणि वनस्पतीजन्य किडनाशक व रोगनाशक औषधीद्रव्य तयार करण्यासाठी प्लास्टीक ड्रम खरेदी करणे, निर्मिती करणे व वापर करणे<br>६. शेता भोवताली जैविक कुंपन तयार करणे | १.अनिवार्य बाबींचे १०० टक्के पालन आणि त्याचे गट प्रमुखाकडुन प्रमाणिकरण (प्रपत्र)<br>२. अन्य पर्यायी ६ बाबींपैकी किमान ५ बाबींची अंमलबजावणीचे गटप्रमुखाकडुन प्रमाणिकरण (प्रपत्र) |

| वर्ष | प्रति हेक्टर देय अनुदान (रक्कम रू.) | शेतक-याने करावयाच्या बाबी | | अनुदान अदा करण्यासाठी अटी |
|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य बाबी | अन्य पर्यायी बाबी | |
| तिसरे | १,००० | १. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्रात रासायनिक खते, किटकनाशके आणि सेंद्रिय शेतीसाठी वर्ज्य निविष्ठांचा वापर बंद करणे<br>२. नैसर्गिक/सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी आवश्यक सेंद्रिय शेतीच्या कामाच्या नोंदी शेत नोंद वहीमध्ये घेणे.<br>३. नैसर्गिक/सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी नियुक्त यंत्रणेस सर्व प्रकारचे सहकार्य करणे. | १.हिरवळीच्या खतासाठी ढेंचा, ताग लागवड<br>२. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी निश्चित केलेल्या क्षेत्राभोवती चर काढुन अन्य क्षेत्रातुन पाणी वाहुन येऊ नये याची व्यवस्था करणे.<br>३. जैविक बीजप्रक्रीया करणे<br>४. बायोडायनामिक/ सुधारीत पध्दतीने सेंद्रिय खत निर्मितीसाठी डेपो लावणे<br>५. बीजामृत जीवामृत आणि वनस्पतीजन्य किडनाशक व रोगनाशक औषधीद्रव्य तयार करण्यासाठी प्लास्टीक ड्रम खरेदी करणे, निर्मिती करणे व वापर करणे<br>६. शेता भोवताली जैविक कुंपन तयार करणे<br>७. समुहस्तरावर स्थापित शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीमार्फत नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील शेतमालाची विक्री करणे. | १.अनिवार्य बाबींचे १०० टक्के पालन आणि त्याचे गट प्रमुखाकडुन प्रमाणिकरण (प्रपत्र)<br>२. अन्य पर्यायी ७ बाबींपैकी किमान ६ बाबींची अंमलबजावणीचे गटप्रमुखाकडुन प्रमाणिकरण (प्रपत्र) |

वरीलप्रमाणे जे शेतकरी अनुदान वितरणासाठीच्या अटीची पुर्तता करतील अशा शेतक-यांच्या अनुदानाची मागणी गट प्रमुखाने संबंधित मंडळ कृषि अधिकारी यांचेकडे करावी. सदर मागणीचे प्रमाणिकरण मंडळ कृषि अधिका-यांनी करावे (अनुदान मागणी व प्रमाणपत्राचा नमुना सोबत). सदर अनुदान मागणी ताकृअ आणि उविकृअ यांचेमार्फत प्रकल्प संचालक, आत्मा यांचेकडे करावी. प्रकल्प संचालक, आत्मा यांनी अनुदानाची रक्कम गटाच्या बँक खात्यावर वर्ग करावी. सदर अनुदान गटाने शेतक-यांना वितरीत करावे किंवा गटाच्या ठरावानुसार सदर योजनेच्या उद्दिष्टपुर्तीसाठी आवश्यक बाबीवर खर्च करावे. या निधीतुन जीवामृत, बीजामृत इ. च्या निर्मितीसाठी आवश्यक प्लास्टीक ड्रम वगळता अन्य कसल्याही निविष्ठांची खरेदी करू नये. गटस्तरावरील जैविक निविष्ठा संसाधन केंद्रातुन निर्मिती केलेल्या कल्चरचा पुरवठा मापक दरावर गटाच्या सभासद शेतक-यांना या निधीतुन करता येईल.

**६.१. क) उपघटक - शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी समभागासाठी अनुदान -**

| उपघटक | परिमाण | उपलब्ध तरतूद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी समभागासाठी अनुदान | प्रति हेक्टर | १,००० | १,००० | ०.०० | ०.०० |
| | प्रति गट (५० हेक्टर) | ५०,००० | ५०,००० | ०.०० | ०.०० |
| | प्रति समुह (१० गटांचे ५०० हे.) | ५,००,००० | ५,००,००० | ०.०० | ०.०० |

समुहस्तरावर ५० हे. च्या १० गटांची एक शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी स्थापन करावयाची आहे (यासाठी याच मार्गदर्शक सुचनातील घटक ३-अ मध्ये नोंदणी शुल्कासाठी रू. ४००००/-ची तरतूद उपलब्ध आहे). अशा कंपनी/सोसायटीचे भाग/शेअर्स गटाचे सर्व शेतकरी ठराविक रक्कम भरून घेतील. अशा सभासदांनी खरेदी करावयाची शेअर्सची किंमत प्रति शेअर्स रू. १००/- असेल. सभासदांनी प्रति हेक्टर १० शेअर्स खरेदी करावेत (रू. १०००/- किंमतीचे). सभासदांचे क्षेत्र १ हे. पेक्षा कमी असल्यास किमान एक शेअर सभासदांनी खेरदी करणे अनिवार्य असेल आणि एक एकरसाठी ४ शेअर्स याप्रमाणे पुढे क्षेत्राच्या प्रमाणात सभासदांनी शेअर्स खरेदी करावेत.

अशा पध्दतीने कंपनी/सोसायटी स्थापन केल्यानंतर किंवा स्थापन करण्यासाठी शेअर्सची रक्कम बँकेत जमा केल्यानंतर त्याबाबतची खात्री करून प्रति सभासद एक हेक्टरच्या मर्यादेत आणि प्रति गट ५० हेक्टरच्या मर्यादेत वर नमुद परिच्छेदाप्रमाणे वाढीव शेअर्स खरेदी करण्यासाठी पुरक अनुदान या तरतूदीतुन सभासदांना देऊन त्यांना वाढीव शेअर्स द्यावे. हे अनुदान सभासदांकडून स्वनिधी उभारण्यास प्रोत्साहन मिळावे या करिता प्रत्येक शेतकऱ्यांने घेतलेल्या समभागाच्या मूल्याच्या/रक्कमेच्या भागभांडवलाच्या समतुल्य किंवा जास्तीत जास्त रु. १,००० प्रति हेक्टरी चे भाग भांडवल उभारणीसाठी अनुदान देण्यात येईल. सदरचे अनुदान मर्यादा प्रति शेतकरी उत्पादक कंपनी कमाल रु. ५.०० लाख राहील.

वरीलप्रमाणे कंपनी/सोसायटी स्थापन करण्यासाठी जिथे शक्य आहे तिथे अभिसरणाद्वारे अन्य योजनांचा लाभ घ्यावा (उदा. केंद्र पुरस्कृत १०,००० FPO स्थापन करण्याची योजना, WDC २.० प्रेरक प्रवेश उपक्रमांतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी स्थापनेबाबतची योजना, स्मार्ट अंतर्गत MSRLM, **माविम यांचेसाठी** स्थापन करण्यात येत असलेल्या कंपन्यांची योजना इ.)

उपरोक्तप्रमाणे नविन कंपन्या/सोसायट्या स्थापन करावयाच्या आहेत तथापि एखादि अस्तित्वात असलेली कंपनी/सोसायटी या योजनेत सहभागी होऊ इच्छित असेल तर नव्याने कंपनी/सोसायटी स्थापन करण्याची आवश्यकता नाही. तथापि या योजनेतील सर्व घटकांची अंमलबजावणी योजनेच्या अटी व शर्ती**प्रमाणे करावी लागेल.**

**कृषि व्यवसाय आराखडा -**

योजनेत स्थापन केलेल्या अथवा अस्तित्वात असलेल्या कंपनी/सोसायटीचे उपरोक्तप्रमाणे जमा होणारे भागभांडवाल, अन्य स्त्रोतातुन मिळणारे अनुदान आणि आवश्यक तेथे घेण्यात येणारे कर्ज याच्या माध्यमातुन शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीने कृषि व्यावसाय आराखडा तयार करावा. असा कृषि व्यवसाय आराखडा हा खालीलबाबींवर आधारीत असावा.

१. जैविक निविष्ठा संसाधन केंद्राची उभारणी, उत्पादन व विक्री
२. कंपनी/सोसायटी सभासदांमार्फत उत्पादीत शेतमालाचे एकत्रिकरण, साठवणुक, प्राथमिक प्रक्रीया आणि विक्री व्यवस्था यासाठी उभारावयाच्या पायाभूत सुविधा
३. उपरोक्त दोन्ही उत्पादनांचे ब्रँडिंग व विक्री व्यवस्थापन
४. अन्य पुरक व्यवसाय

अशा कृषि व्यवसाय आराखड्यासाठी कृषि व अन्य शासकीय विभागाच्या योजनांमधुनही कृतिसंगमाद्वारे/अभिसरणाद्वारे निधी उभारावा (उदा. पोकरा, स्मार्ट, मॅगनेट, पीएमएफएमई, एमआयडीएच, एनएफएसएम, मुख्यमंत्री अन्नप्रक्रीया योजना, नाबार्ड इ.)

**६.१ ड) उपघटक - नैसर्गिक/सेंद्रिय शेती प्रमाणीकरण**

| उपघटक | परिमाण | उपलब्ध तरतुद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| प्रति शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत नैसर्गिक/सेंद्रिय शेती प्रमाणीकरण | प्रति समुह (१० गटांचे ५०० हे.) | ५,००,००० | १,१०,००० | २,२५,००० | १,६५,००० |

या उपघटकांतर्गत उपलब्ध तरतूदीतुन समुहस्तरावरील प्रति कंपनी/सोसायटीसाठी खालील बाबीवर खर्च करावा.

I. नैसर्गिक/सेंद्रिय प्रमाणिकरण शुल्क (ठोक (Lumpsum) रक्कम रू. २५००००/- प्रति समुह)
II. अंतर्गत नियंत्रण निरिक्षक (ICS inspector) किंवा प्रमाणिकरणासाठी आवश्यक मनुष्यबळाच्या मानधनासाठी अनुदान - रू. २१६०००/-
III. अनुषंगीक बाबी रू. ३४०००/-

**६.१ ड) i. उपघटक नैसर्गिक/सेंद्रिय प्रमाणिकरण** - योजनेतंर्गत आर्थिक मर्यादेच्या अधिन राहून तृतिय पक्ष प्रमाणिकरणाचे खालील पर्याय शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीला उपलब्ध असतील.

अ. NPOP- National Programme for Organic Production
आ. PGS -Participatory Guarantee System सहभागिता हमी पध्दती
इ. Natural Farming Certification नैसर्गिक शेती प्रमाणिकरण

उपरोक्त तीनपैकी कोणतीही एक प्रमाणिकरण पध्दती निवड करण्याची मुभा संबधीत शेतकरी उत्पादक कंपनीला राहील .यासाठी शेतकरी उत्पादक कंपनीने सर्वसाधारण सभेत प्रमाणिकरण पध्दतीची निवड करुन ठराव घ्यावा .एकदा निवड केलेल्या प्रमाणिकरण पध्दतीत शक्यतो बदल करू नये. निवड केलेल्या प्रमाणिकरण पध्दतीसाठी आवश्यक यंत्रणची/एजन्सीची नेमणुक/Empanelling डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनच्या मदतीने राज्यस्तरावरून करण्यात येईल.

**६.१ ड) ii. अंतर्गत नियंत्रण निरिक्षक (ICS Inspector) किंवा प्रमाणिकरणासाठी आवश्यक मनुष्यबळ** - प्रमाणिकरणासाठी उपरोक्त तीनपैकी कोणत्याही पध्दतीची निवड केल्यास प्रमाणिकरणासाठी आवश्यक अभिलेखे ठेवणे, ऑनलाईन माहीती भरणे,शेतक-यांना मार्गदर्शन करणे इ. कामासाठी पहिल्या वर्षी तीन महीने (२ जानेवारी, ते मार्च) दुस-या वर्षी १२ महीने (एप्रिल ते मार्च) व तीस-या वर्षी नऊ महीने (एप्रिल ते डिसेंबर) प्रति समुह दोन किंवा तीन अर्धवेळ काम करणारे स्थानिक स्वयंसहाय्यकाच्या स्वरूपात प्रतिमहा ठराविक मानधनावर तीन स्वयंसहाय्यक नेमावेत. या तीन स्वयंसहाय्कांना प्रति महा रू. ३०००/- मानधन द्यावे. अशा मनुष्यबळाची नियुक्ती शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीमार्फत प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या मानयतेने करावी. या मनुष्यबळाची शैक्षणिक आर्हता, प्रशिक्षणे इ. पिकेव्हीव्हाय अंतर्गत ICS inspector च्या धर्तीवर राहील.

**६.१ ड) iii. अनुषंगीक बाबी** - उपरोक्त दोन बाबींसह प्रमाणिकरणासाठी आवश्यक बाबीसाठी या तरतूदीतुन खर्च करता येईल.

या पेक्षा जास्त येणारा खर्च शेतकरी उत्पादक कंपनीला स्वत: करावा लागेल. निवड केलेल्या प्रमाणिकरण पध्दतीप्रमाणे उत्पादित शेतमालाची नैसर्गिक/सेंद्रिय शेतमाल म्हणून गुणवत्ता राखण्यासाठी अंतर्गत नियंत्रण प्रणाली (ICS) स्थापित करण्याची व अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शेतकरी उत्पादक कंपनीची राहील. तथापि याबाबतचे सर्व मार्गदर्शन व प्रशिक्षण संबंधित गट व शेतकरी उत्पादक कंपनीला योजनेच्या माध्यमातुन देण्यात यावे.

**६.२ घटक- शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी स्थापन करणे व त्यांचे प्रशिक्षण -**

या घटकासाठी समुहस्तरावरील कंपनी/सोसायटीसाठी रू. १,००,०००/- इतकी तरतूद उपलब्ध आहे. उपलब्ध तरतूद अ,ब,क उपघटकावर खर्च करण्याचे नियोजन खालीलप्रमाणे करावे.

**६.२. अ) उपघटक- शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी स्थापना**

| उपघटक | परिमाण | उपलब्ध तरतुद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकुण | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी स्थापना | प्रति समुह (१० गटांचे ५०० हे.) | ४५,००० | ३५,००० | ५००० | ५००० |

शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी स्थापनेसाठी रक्कम रु. ४५,०००/- तरतूद आहे. या तरतूदीतुन वर्षनिहाय बाबनिहाय देय अनुदान व त्यावर करावयाचा खर्च याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

- **वर्ष पहिले** - पहिल्या वर्षी अधिकतम रू. ३५०००/- मधुन कंपनी/सोसायटी नोंदणी शुल्क, कंपनी सेक्रेटरी (CS) शुल्क सी.ए., वकील इ. चे शुल्क आणि इतर अनुषंगिक बाबीसाठी खर्च करावा. कंपनी स्थापन करावयाची झाल्यास निधी अधिक लागेल तथापि राज्याच्या सहकार कायद्यांतर्गत सोसायटी स्थापन करावयाची झाल्यास खर्च कमी येईल, तथापि यासाठी रू. ३५०००/- ठोक अनुदान देय राहील. हे अनुदान समुहातील कंपनी/सोसायटी स्थापन करण्यासाठी प्रवर्तक म्हणुन काम करणा-या एका गटाच्या बँक खात्यावर अगाऊ स्वरूपात कंपनी स्थापन करण्यासाठी द्यावे.
- **दुसरे व तीसरे वर्ष** - दुस-या व तीस-या वर्षी ज्या प्राधिका-याकडे कंपनी/सोसायटीची नोंदणी केलेली आहे त्या प्राधिका-याला लेखापरिक्षण अहवालासह अन्य कागदपत्रे सादर करावी लागतात. यासाठी दुस-या व तीस-या वर्षी प्रत्येकी रू. ५०००/- प्रमाणे ठोक अनुदान देय राहील. हे अनुदान समुहस्तरावरील कंपनी/सोसायटीला आर्थिक वर्षाच्या सुरूवातीला अदा करावे.

उपरोक्तप्रमाणे नविन कंपन्या/सोसायट्या स्थापन करावयाच्या आहेत तथापि एखादि अस्तित्वात असलेली कंपनी/सोसायटी या योजनेत सहभागी होऊ इच्छित असेल तर नव्याने कंपनी/सोसायटी स्थापन करण्याची आवश्यकता नाही. तथापि या योजनेतील सर्व घटकांची अंमलबजावणी योजनेच्या अटी व शर्तीप्रमाणे करावी लागेल ,तसेच नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी योजनेत सहभागी होणा-या सर्व शेतक-यांना भागधारक म्हणुन कंपनीत सहभागी करून घ्यावे लागेल.

अस्तित्वात असलेल्या कंपनी/सोसायटीच्या बाबतीत घटना दुरूस्ती ,नैसर्गिक/सेंद्रिय शेती करणा-या नवीन शेतक-यांना भागधारक म्हणुन सहभागी करून घेणे आणि नवीन संचालकांचा समावेश करणे इ .साठीचा खर्च भागविणेसाठी अशा कंपनी/सोसायटीला पहिल्या,दुस-या व तीस-या वर्षी अनुक्रमे रू. ३५०००/-, रू. ५०००/- व रू. ५०००/- प्रमाणे अनुदान देय राहील.

**६.२.ब) उपघटक- शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी संचालक प्रशिक्षण :** शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी ज्या प्राधिका-याकडे नोंदविण्यात आलेली आहे त्या प्राधिका-याच्या कायद्यातील तरतूदी, ठेवावयाच्या नोंदवह्या, सदर प्राधिका-यास सादर करावयाची वार्षिक अहवाल, कागदपत्रे, कंपनीचा/सोसायटीचा व्यवसाय आराखडा कसा तयार करावा, एकुणच कंपनी कशी चालवावी आणि सेंद्रिय शेतमालाचे विपणन कसे करावे याबाबत या घटकातुन संचालकांना प्रशिक्षण देण्यात येईल.

| उपघटक | परिमाण | उपलब्ध तरतुद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी संचालक प्रशिक्षण | प्रति समुह (१० गटांचे ५०० हे.) | ३७५०० | ३७५०० | ० | ० |

**उपरोक्त तरतूदीतुन वर्षनिहाय बाबनिहाय खालीलप्रमाणे खर्चासाठी तरतूद राहील.**

**६.२.ब.(i)** शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी संचालकांच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक ट्रेनिंग मोड्युल तयार करण्यासाठी पहिल्या वर्षी योजनेत स्थापन करावयाच्या एकुण १३६७ शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटया प्रति कंपनी/सोसायटी रू. ५०००/- एवढी रक्कम राज्यस्तरावर राखीव ठेवण्यात येईल. मिशन कार्यालयामार्फत या तरतूदीतुन संचालकांच्या व अन्य ट्रेनिंगसाठी ट्रेनिंग मोड्युल विकसित करण्यात येतील.

**६.२.ब.(ii). संचालकांचे प्रशिक्षण** - सदरचे प्रशिक्षण कृषि विज्ञान केंद्रे, रामेती आणि आवश्यकता भासल्यास अन्य संस्थांमध्ये आयोजित करण्यात येईल. हे प्रशिक्षण प्रति कंपनी/सोसायटी ५ संचालकांना देण्यात येईल. या प्रशिक्षणासाठी प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिन रू. २०००/- इतकी तरतूद राहील. हे प्रशिक्षण तीन दिवसांचे निवासी प्रशिक्षण असेल.

**६.२.ब.(iii) प्रशिक्षणार्थींचा प्रवास भत्ता** - प्रति प्रशिक्षणार्थी रू. ५००/- ठोक प्रशिक्षण प्रवास भत्ता स्वतंत्ररीत्या देय राहील.

**६.२.क) उपघटक- शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी कार्यालयीन खर्च -**

| उपघटक | परिमाण | उपलब्ध तरतुद (रूपये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकुण तीन वर्षाकरिता | पहिले वर्ष | दुसरे वर्ष | तिसरे वर्ष |
| शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी कार्यालयीन खर्च | प्रति समुह (१० गटांचे ५०० हे.) | १७५०० | ७००० | ५५०० | ५००० |

या घटकातुन कंपनी/सोसायटीला पहिल्या वर्षी कंपनी स्थापन झाल्यानंतर लगेच रू.७०००/- व दुस-या वर्षी आर्थिक वर्षाच्या सुरवातीला रू.५५००/- व तिस-या वर्षी रू. ५०००/- ठोक अनुदान कार्यालयीन खर्चासाठी कंपनी/सोसायटीच्या बँक खात्यावर अदा करावे.

### ६.३.घटक - जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (Bio-Input Resource Center) स्थापन करणे

नैसर्गिक/सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्यातील अडचणींपैकी जैविक निविष्ठांची उपलब्धता कमी असणे आणि या निविष्ठा उपलब्ध झाल्या तरी त्यांची गुणवत्ता योग्य नसणे या अडचणी प्रमुख आहेत. नैसर्गिक/सेंद्रिय शेतीमध्ये रासायनिक खते, रासायनिक किडनाशके, बुरशीनाशके आणि प्रतिजैविके इ. प्रतिबंधित निविष्ठांचा वापर एकदम बंद केल्यास उत्पादनात आणि उत्पन्नात येणारी घट ही सर्वसामान्य शेतक-यांसाठी मोठी अडचण आहे. या प्रतिबंधित निविष्ठांचा वापर थांबवुन पर्यायी जैविक निविष्ठांचा वापर करून उत्पादनात येणारी घट कमी करणे शक्य आहे आणि काही वर्षानंतर वर नमुद प्रतिबंधित निविष्ठांचा वापर करून जेवढे उत्पादन येते जवळपास त्या पातळीपर्यंत उत्पादन घेणे शक्य आहे. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे अशा जैविक निविष्ठांची उपलब्धता, गुणवत्ता तसेच या निविष्ठा बाजारातुन विकत घेतल्यास येणारा खर्च ही फार मोठी समस्या आहे.

या समस्येवर मात करावयाची झाल्यास विकेंद्रित स्वरूपात आणि सेंद्रिय/नैसर्गिक शेती करणा-या शेतक-यांच्या शक्यतो शेतावरच जैविक निविष्ठांचे उत्पादन घेणे आवश्यक आहे. शेतक-यांच्या शेतावर जैविक निविष्ठांचे उत्पादन घेण्यासाठी अशा शेतक-यांच्या गावात किंवा शेजारच्या गावात जैविक निविष्ठा उत्पादनासाठी आवश्यक कल्चर (उदा. जसे दुधापासुन दही करण्यासाठीचे विरजन) उपलब्ध होणे आवश्यक आहे. असे गुणवत्तापुर्ण कल्चर मापक दरात पुरवठा करणारे शाश्वत स्रोत उपलब्ध होणे आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊन या योजनेत स्थापन करावयाच्या कंपन्या/सोसायट्या तसेच शेतकरी गटस्तरावर जैविक निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

### ६.३. अ) उपघटक - समुहस्तरावरील शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीस्तरावर जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (Bio-Input Resource Center - BRC) स्थापन करणे

यासाठी शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीला जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (BRC) उभारणीसाठी येणा-या खर्चाच्या ७५ टक्के किंवा अधिकतम रू. ५,००,०००/- (अक्षरी- पाच लाख) यापैकी जे कमी असेल ते अनुदान देणे प्रस्तावित आहे. या केंद्राच्या उभारणीसाठी आवश्यक पायाभुत सुविधा, प्रयोगशाळा साहीत्य, कर्मचारी इ. बाबतचा तपशिल स्वतंत्रपणे देण्यात येईल.

### ६.३. ब) उपघटक - शेतकरी गटस्तरावरील जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (Bio-Input Resource Center - BRC) स्थापन करणे

यासाठी शेतकरी गटस्तरावर जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (BRC) उभारणीसाठी येणा-या खर्चाच्या ७५ टक्के किंवा अधिकतम रू. २,००,०००/- (अक्षरी- दोन लाख) यापैकी जे कमी असेल ते अनुदान देणे प्रस्तावित आहे. या केंद्राच्या उभारणीसाठी आवश्यक पायाभुत सुविधा, प्रयोगशाळा साहीत्य, कर्मचारी इ. बाबतचा तपशिल स्वतंत्रपणे देण्यात येईल. योजनेत ५० हे. चा एक शेतकरी गट याप्रमाणे लक्षांक देण्यात आलेले आहे. तथापि कोकण विभागात किमान १० हेक्टरचा एक आणि कोकण वगळता उर्वरीत महाराष्ट्रात किमान २५ हेक्टरचा एक गट (अधिकतम ५० हे.) स्थापन करणेबाबत या मार्गदर्शक सुचनांमध्ये यापुर्वी नमुद करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने १० हे. च्या गटासाठी आणि २५ हे. च्या गटासाठी क्षेत्राच्या प्रमाणात अनुदान प्रस्तावित करून वेगवेगळे पर्यायी मॉडेल देण्यात येतील.

**६.४. घटक - शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीच्या पणन सुविधेसाठी अर्थसहाय्य -**

**६.४. अ) उपघटक - शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीच्या पणन सुविधेसाठी विक्री केंद्र -** शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटीस्तरावर पणन सुविधेसाठी एक विक्री केंद्र स्थापन करावयाचे असुन त्याकरीता वाहन खरेदी किंवा विक्री केंद्र बांधणीसाठी येणा-या खर्चाच्या ७५ टक्के किंवा रू. ४,५०,०००/- जे कमी असेल तेवढे अर्थसहाय्य देय आहे.

या तरतूदीतुन बाबनिहाय, वर्षनिहाय कसा खर्च करावा याबाबतच्या मार्गदर्शक सुचनानंतर निर्गमित करण्यात येतील.

**६.४. ब) उपघटक - नैसर्गिक/सेंद्रिय शेती, नैसर्गिक/सेंद्रिय उत्पादने व विपणन, ब्रँडिंग आणि प्रचार प्रसिध्दी -** यासाठी प्रति शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटी रू. ५०,०००/- प्रमाणे एकुण १३६७ शेतकरी उत्पादक कंपनी/सोसायटयांची एकुण तरतूद रू. ६,८३,५०,०००/- मधुन राज्यस्तरावरून आराखडा तयार करून ही बाबा राबविण्याचे नियोजन करण्यात येईल. यात कंपनी/सोसायटीस्तरापासुन राज्यस्तरापर्यंत राबवावयाच्या विविध बाबींचा समावेश असेल.

**६.५. घटक - प्रकल्प व्यवस्थापन कक्ष -**

योजनेअंतर्गत सन २०२०-२१ मधील ३५५ गट सन २०२२-२३ मधील ५०० गट असे एकूण सद्यस्थितीतील ८५५ गट यांची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीने करण्यात यावी .तसेच योजनेअंतर्गत सेंद्रिय शेतीचे एनपीओपीअंतर्गत प्रमाणिकरण करणे, एफपीसी स्तरावर समुह संकलन केंद्र (Cluster Aggregation Centre-CAC), विभागस्तरावर एक याप्रमाणे एकूण आठ सामुहिक सुविधा केंद्र (Common Facility Centre-CFC), उत्पादित सेंद्रिय उत्पादनांची प्रक्रिया व मूल्यवृद्धी करणे, विक्री केंद्र स्थापन करणे, संगणकीकरण, योजनेची व्याप्ती लक्षात घेता कृषि आयुक्तालय, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, विभाग, जिल्हा व तालुकास्तरावर आवश्यकतेनुसार बाहयस्त्रोताव्दारे कंत्राटी कर्मचारी उपलब्ध करणे इत्यादी बाबींसाठी एकूण रु. १५७.०२ कोटी आर्थिक तरतूदीस मान्यता देण्यात येत आहे. या तरतूदीतुन बाबनिहाय, वर्षनिहाय कसा खर्च करावा याबाबतच्या मार्गदर्शक सुचना नंतर निर्गमित करण्यात येतील.

**६.६. घटक - कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण व प्रात्यक्षिके -**

राज्यातील एकूण ४५ कृषि विज्ञान केंद्रांवर नैसर्गिक व सेंद्रिय निविष्ठांसाठी कल्चर निर्मिती, निविष्ठा निर्मिती, कार्यक्षेत्रातील प्रात्यक्षिक, गावात गट स्थापन करुन प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा (PIA) म्हणून काम करणे, कर्मचारी व शेतकरी प्रशिक्षण इत्यादी बाबींसाठी प्रति कृषि विज्ञान केंद्रासाठी रू. २५.०० लाख तरतूद उपलब्ध आहे.

कृषि विज्ञान केंद्रांना त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये स्थापित झालेले गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषि विभागातील कर्मचारी/अधिकारी यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी पार पाडावयाची आहे. त्यासाठी कृषि विद्यापिठ व कृषि विज्ञान केंद्र यांच्या समन्वयाने प्रशिक्षण मोड्युल्स तयार करून प्रशिक्षण देणे हे महत्वाचे काम करावयाचे आहे.

**अ)** कृषि विज्ञान केंद्राने कार्यक्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती व पिक पध्दती याचा अभ्यास करून त्यांच्या प्रक्षेत्रावर नैसर्गिक/सेंद्रिय पिकांची प्रात्यक्षिके राबवायची आहेत. यात पिकांच्या वाणाची निवड, मशागत, लागवडी बाबतचे तंत्रज्ञान, जैविक खत तयार करणे व जैविक खतांच्या मात्रा, रोग/किड नियंत्रणसाठी

वापरण्यात येणारे जैविक निविष्ठांचा वापर, काढणी व काढणीपश्चात तंत्रज्ञान याबाबत संशोधन करून विभागास अवगत करणे,शेतक-यांना त्यांच्या शेतावर सेंद्रिय शेती करताना अवलंबवयाचे तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

**ब)** जिल्ह्यातील कृषी व संलग्न विभागाचे नैसर्गिक शेती मध्ये काम करणारे अधिकारी व कर्मचारी, शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक, तज्ञ प्रशिक्षक व अंतर्गत नियंत्रण निरीक्षक यांना नैसर्गिक/सेंद्रिय शेतीबाबत अद्यावत तंत्रज्ञान माहीती उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

उपरोक्त सर्व बाबींच्या अंमलबजावणीसाठी एक स्वतंत्र प्रकल्प अहवाल कृषि विज्ञान केंद्राकडुन प्रकल्प संचालक, आत्मा यांचेमार्फत मिशन कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. या प्रकल्पाची मिशन कार्यालयामार्फत छाणनी होऊन प्रस्ताव मिशन कार्यकारी मंडळापुढे मंजुरीसाठी सादर केले जाईल व कार्यकारी मंडळ त्यास मान्यता देईल.

**६.७. घटक - कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून संशोधन व प्रशिक्षण-**

राज्यातील एकूण ४ कृषि विद्यापीठांच्या स्तरावर असलेल्या ४ सेंद्रिय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रांवर नैसर्गिक व सेंद्रिय शेतीसंबंधीत संशोधन, प्रक्षेत्र विकसित करणे, पिकनिहाय लागवड पध्दती (Package of Practices) विकसित करणे, नैसर्गिक व सेंद्रिय निविष्ठांची चाचणी करुन वैधता (Validation) करणे, शेतकरी वापर करत असलेले प्रचलित पध्दती व विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास, कार्यक्षेत्रातील गावात गट स्थापन करुन प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा (PIA) म्हणून काम करणे, अभ्यास दौरा, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण इत्यादी बाबींसाठी प्रति कृषि विद्यापीठासाठी रू. ५००.०० लाख तरतूद उपलब्ध आहे.

राज्यातील एकूण ४ कृषि विद्यापीठांच्या स्तरावर असलेल्या ४ सेंद्रिय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रांवर नैसर्गिक व सेंद्रिय शेतीसंबंधीत संशोधन करणे अपेक्षित आहे. त्यामध्ये भौगोलिक परिस्थिती व पीकपध्दती नुसार पीकनिहाय लागवड पद्धती प्रक्षेत्रावर विकसित करणे (Package of Practices), नैसर्गिक व सेंद्रिय निविष्ठांची चाचणी करून वैधता (Validation) निश्चित करणे. शेतकरी वापर करत असलेले प्रचलीत नैसर्गिक व सेंद्रिय शेती पद्धती व विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा अभ्यास इत्यादी बाबींसाठी प्रती कृषी विद्यापीठ रक्कम रु. ५.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

कृषि विद्यापीठांनी नैसर्गिक/सेंद्रिय कार्यक्रम राबविण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावरील अधिकारी, कर्मचारी, शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक, तज्ञ प्रशिक्षक व अंतर्गत नियंत्रण निरीक्षक,शेतकरी यांना प्रशिक्षण देण्यासाठी योग्य प्रशिक्षण मोड्युल तयार करणे हे महत्वाचे काम प्रथम वर्षाच्या सुरवातीस पुर्ण करणे व सदर मोड्युल कृषि विज्ञान केंद्र यांना उपलब्ध करून देणे. कृषि विज्ञान केंद्रामार्फत घेण्यात येणा-या प्रशिक्षणाचे संनियंत्रण करणे तसेच गावपातळीवरील शेतक-यांच्या प्रशिक्षणासाठी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या शास्त्रज्ञांना शेतकरी प्रशिक्षणासाठी व क्षेत्रिय भेटीसाठी उपलब्ध करून देणे.

